शनिवार १८ मार्च १९७८
७५ पैसे

# माणूस



यमुनेच्या पुलाखालून
बरंच पाणी
वाहून गेले आहे...

पुन्हा एकदा
दिल्लीच्या वाटेवर...
बरोबर एक वर्षानंतर..
माणूस प्रतिनिधी

**साप्ताहिक माणूस**

वर्ष सतरावे-अंक बेचाळीस

१८ मार्च १९७८

मूल्य पंचाहत्तर पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी।
**चाळीस रुपये**

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४४३४५९

# समांतर शासन

श्री. ग. मा.

इंदिरा गांधी
एक सोन्याची सुरी.

वसंतरावदादांनी ही आपल्या उरात खुपसून घेतलेली आहे.

ते स्वतः गारद झालेले आहेतच; आणि काँग्रेसकार्यकर्तेच नाहीत, तर सर्वसामान्य मराठी माणूसही यामुळे जखमी झालेला आहे. वसंतरावदादांच्या या स्वाभिमानशून्यतेमुळे सर्वांचीच मान खाली गेलेली आहे.

हा एक मतदारांचा केला गेलेला विश्वासघात आहे आणि त्याचे प्रायश्चित्त वसंतरावदादांना मिळाल्याशिवाय राहणार नाही!

मुख्यमंत्रिपद मिळूनसुद्धा वसंतरावदादा एक कैदी म्हणून यापुढे वावरणार आहेत. तिरपुडयांची कैद, बॅ अंतुल्यांची कैद, साठ्यांची कैद, दर्डांची कैद आणि बाईंचा फक्त धाक! आता तोसुद्धा प्रत्यक्ष दाखवण्याची बाईंना गरज उरलेली नाही मुंबई थोडी उंचावली की पुढे बंदा हाजिर है!

मुख्य परिणाम विकासकार्यक्रमांवर होणार आहे मंजूर योजनांच्या कार्यवाहीतही अनेक अडथळे उत्पन्न होतील, केले जातील; मग नवीन योजनांचा उठाव, ही तर लांबचीच गोष्ट.

मंत्रिमंडळातच कटकारस्थानांना ऊत येईल व त्याचा परिणाम प्रशासनयंत्रणा खिळखिळी होण्यात झाल्याशिवाय राहणार नाही.

अगोदरच सरकारी नोकर संपामुळे दुखावलेले. तिकडे तिरपुडयांचा सासुरवास, इकडे नोकरशाहीचा ताप! दादांची अवस्था फार शोचनीय होणार आहे.

ढेकूण असलेल्या खुर्चीत बसून राहण्याची शिक्षा!

अशी खुर्ची जनता पक्षाकडे आली नाही हे एकापरीने या पक्षाचे भाग्यच म्हटले पाहिजे!

नाही म्हटले तरी वसंतरावदादांना व त्यांच्या काँग्रेस पक्षाला खुर्चीवर बसण्याची, बसून राहण्याची खूप वर्षांची सवय आहे. त्यामुळे नवीन दादामंत्रिमंडळ एकदमच कोलमडेल अशी काही शक्यता नाही जनतामंत्रिमंडळ मात्र एक दिवस तरी टिकू शकले असते की नाही, याची शंकाच होती खरं म्हणजे जनतावाले तरी राजभवनावर शिष्टमंडळ घेऊन कशासाठी जात होते, ते समजू शकत नाही. इतक्या कुबडया घेऊन सरकार स्थापन करण्याचा एस्. एम जोशींचा अट्टाहासही काही फारसा स्पृहणीय नव्हता. लोकमताचा कौल जनता पक्षाला स्पष्टपणे मिळाल्याशिवाय सत्ताग्रहण करणे म्हणजे पराभवाला, नाचक्कीला निमंत्रण देणे होय जनतावाल्यांची सगळी शक्ती अस्थिर सत्ता टिकवून धरण्यात आणि पळणारे आमदार–नामदार धरून, डांबून ठेवण्यात खर्च झाली असती व विकासकार्यक्रमांच्या अंमलबजावणीकडे, दिलेल्या अभिवचनांच्या पूर्ततेकडे दुर्लक्ष झाले असते. दादांचे मंत्रिमंडळ आज नाही उद्या गडगडणार आहेच. त्या वेळी जनतावाल्यांना पुन्हा सत्ताग्रहणाची उबळ येण्याची शक्यता आहे. कुठल्याही स्थितीत अशी अर्धवट सत्ता जनताकडे येणे फार धोक्याचे आहे. त्यापेक्षा सहा महिने राष्ट्रपती–राजवट येऊ देणे व जनतेकडे पुन्हा स्वच्छ व निःसंदिग्ध कौल मागण्यासाठी जाणे हे अधिक श्रेयस्कर आहे. किमान दीडशे जागा जनता व मित्रपक्षांना मिळायला हव्यात. इतके बहुमत पाठीशी असल्याशिवाय 'जनता' ला कृतीचे कुठलेच स्वातंत्र्य मिळू शकणार नाही, धडाडीने एकही पाऊल उचलता येणार नाही! एवढे बहुमत पाठीशी असताना दिल्लीला अद्याप गेल्या वर्षभरात जुन्या चाकोऱ्या तोडता आलेल्या नाहीत. मग महाराष्ट्रातले डळमळीत जनता सरकार काय पराक्रम दाखवू शकणार, हे उघडच आहे. निवडणुकीने धडा शिकविला तरी पक्षांतर्गत मारामाऱ्या व ओढाताण अद्याप कमी होत नाही. निवड-

णुकीचा शेवटचा निकाल हाती येण्याच्या अगोदर वसंतरावदादा पाटील दिल्लीदाखल होऊन, इंदिरा गांधींच्या बंगल्यावर पुढील वाटाघाटींसाठी हजर झाले. 'जनता'ला मात्र आपला नेता निवडायला आठवडा लागला. तुरी बाजारात असतानाच जनता-वाल्यांमध्ये इतके मतभेद आणि शहप्रतिशहांचे राजकारण तर सत्तेच्या तुरी प्रत्यक्ष हातात आल्यावर या प्रकारांना किती ऊत येईल याची कल्पनाच केलेली बरी! हे अंतर्गत मतभेद आणि शहप्रतिशह होते, म्हणूनच जनता पक्षाला इतक्या कमी जागा निवडणुकीत मिळाल्या. पुणे शहरात 'जनता'ला शंभर टक्के यश मिळते आणि जिल्ह्यात जनता पक्षाचे बहुतेक उमेदवार पडतात यामागील कारणे आता लपून राहिलेली नाहीत. असे पक्षांतर्गत दुहीचे वातावरण फार ठिकाणी आहे आणि ते कमी झाल्याशिवाय जनताला अपेक्षित असा निर्णायक विजय मिळणे यापुढेही फार अवघड आहे. लोकांनी तरी कॉंग्रेसच्या आगीतून निघून 'जनता'च्या फुफाट्याकडे का वळावे? सत्ताग्रहणाची घाई करण्याऐवजी 'जनता'ने आत्मपरीक्षण करून ही अंतर्गत विळे बुजवण्याचा, भुयारे हुडकून ती बंद करण्याचा नेटाने प्रयत्न करायला हवा. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या, जिल्हा परिषदांच्या निवडणुका जवळ आल्याच आहेत. त्यात मजबूत यश मिळवण्यासाठी कंबर कसली पाहिजे. नंतर दादा-मंत्रिमंडळाच्या पाडापाडीकडे लक्ष पुरवायला हरकत नाही. सध्या दादांना अधिक छळण्यात काही राम नाही. फार नवससायास करून खुर्ची मिळविली आहे त्यांनी. कुठलाही स्वाभिमानी माणूस मोजणार नाही इतकी जबरदस्त किंमत या खुर्चीसाठी दादांनी मोजली आहे. काही काळ त्यांना लाभू द्यावी ती. वय झाले आहे. प्रकृती ठीक नसते. विश्रांतीची गरज आहे. 'जनता'ने काही काळ दयाशील राहायला हरकत नाही. तिरपुड्यांसारखे लगेच घाव घालणे बरे नाही. शिवाय 'जनता'लाही तोवर तयारी करण्यास पूर्ण वेळ मिळेल. आज तयारी अपूर्ण आहे, परीक्षेला बसणे धोक्याचे आहे. दादा मंत्रिमंडळाच्या अटळ अपयशावर 'जनता'चे अल्पयशही उठावदार दिसण्याची शक्यता आहे; पण आज तेवढीही तयारी दिसत नाही. तेव्हा जनता आणि मित्रपक्षांनी सबुरीने जाणे, आपला पक्ष मजबूत बनविणे हेच पक्षाच्या व महाराष्ट्रीय जनतेच्याही एकूण हिताचे आहे.

□

जनता पक्षातील जो तरुण व क्रांतिकारक वर्ग आहे त्याने मात्र निवडणुका व सत्ता यापलीकडे जाऊन गाव व तालुका पातळीवर संघटनाबांधणीच्या कामाकडे अधिक लक्ष पुरवायला हवे. लोहियावाद्यांचा केवळ नकारात्मक गैरकॉंग्रेसवाद यापुढे जनता-पक्षाला फार पुढे नेऊ शकणार नाही, हे आता तरी ओळखायला हवे. आता आठ राज्यात व केंद्रात जनता पक्षाचे शासन आहे. महाराष्ट्रात प्रमुख विरोधी पक्ष म्हणून जनतेने या पक्षावर विश्वास व्यक्त केला आहे. एवढी ताकद कमावलेला पक्ष केवळ नकारात्मक भूमिका मांडीत राहिला तर यापुढची प्रगती खुंटेल, कदाचित् गळतीही सुरू होईल. असंतोष संघटित करणे, मागण्या करीत राहणे यावर समाधान न मानता विकासाचे काही घडक कार्यक्रम आपल्या बळावर हाती घेण्याचीही विधायक उपक्रमशीलता पक्षाने दाखवावयाला हवी. इतकी ताकद असणाऱ्या पक्षाला हे अशक्य नाही. निवडणुकीसाठी लाखो रुपये पक्ष गोळा करू शकतो. दहावीस ठिकाणी लहानसहान धरणे, छोटे पाझर तलाव, विहिरी असा कार्यक्रम स्वतःच्या बळावर सुरू करून नंतर शासनामार्फत तो सर्वत्र पूर्ण करून घेणे अगदी अशक्य आहे का? प्रत्येक खेड्यात पिण्याच्या पाण्याची सोय करणे हे जनता जाहीरनाम्यातील एक आश्वासित कलम आहे. या दृष्टीने काही पूर्वतयारी जनता पक्षाने चालविली आहे का? उद्या सत्तेवर आल्यावर तरी हे आश्वासन जनता पक्ष कसे पूर्ण करणार आहे? केवळ नोकरशाहीवर सर्व मदार ठेवली जाणार असेल तर गेल्या तीस वर्षांत जे घडले तेच घडत राहील! रोजगार हमीबाबत तर जनता व मित्रपक्षांचे व सत्तारूढ कॉंग्रेसचेही मतैक्य आहे. लोकांना काम हवे आहे, शासनाजवळ पैसा आहे. ग्रामीण भागाचा कायापालट करू शकणाऱ्या उत्पादक योजनांचे आराखडेच तयार नसतात, असा नेहमीचा अनुभव आहे. आपापल्या भागातील योजना तयार करणे, त्यासाठी जनमत संघटित करण, नोकरशाहीवर दडपण आणणे ही कामे आजही जनता-कार्यकर्त्यांना हाती घेता येण्यासारखी आहेत. खरे म्हणजे एक समांतर शासनच जनता व मित्र पक्षांनी आता चालू करायला हवे. बिहारमध्ये नवनिर्माण आंदोलन जोरात होते तेव्हा काही भागात जनता-सरकारे अस्तित्वात आलेली होती. शासनातील भ्रष्टाचार कमी करण्यावर या जनता सरकारांचा मुख्य भर असला तरी इतरही शिक्षण व विकास कार्यक्रम या जनता सरकारांच्या वतीने काही काळ हाती घेतले गेलेले होते. चळवळ विकसित अवस्थेला पोचल्याचा हा एक पुरावाच होता. महाराष्ट्रात ही स्थिती अजून उत्पन्न झालेली नाही; पण ती झाल्याशिवाय केवळ मंत्रिमंडळ बदलूनही काही उपयोग नाही. ज्या भागात जनता व मित्रपक्षांचे कार्यकर्ते आहेत तेथे या दृष्टीने पूर्वतयारी व्हायला हवी. विधायक कार्य आणि राजकारण यांचा मेळ बसला पाहिजे असे नेहमी म्हटले जाते. गांधीजींनी असा मेळ जमवला होता. म्हणजे खेडोपाडी परकीय शासनाशी जवळजवळ समांतर असे कॉंग्रेसचे शासन त्यांनी उभे केले होते. ज्यांना केवळ सत्तान्तर हवे आहे त्यांना एवढा खटाटोप करण्याची गरज नाही. आयारामगिरीवर त्यांचे भागू शकते; पण खरोखरच नवा पर्याय खडा करायचा असेल तर असे जनसंघटन जागोजाग उभे केल्याशिवाय गत्यंतर नाही. संपूर्ण क्रांतीचा केवळ जप करून, किंवा जयप्रकाशांच्या नावाने अघूनमधून गहिवरले बोलून-लिहून काहीही साधणार नाही. समांतर जनसंघटन उभे केले पाहिजे आणि त्यासाठी निवडणूक आणि सत्ताबाजी यापलीकडे जाण्याची बहुसंख्य कार्यकर्त्यांची तयारी हवी. अशी तयारी आज दिसत नाही. लोकांना निदान जाणवत तरी नाही. निर्णायक बहुमत मिळाले नाही, जनतेने आपल्याला अपेक्षित कौल दिला नाही हे दिसून आल्यावर सत्तेसाठी क्षणभरही घोटाळत राहण्याची आवश्यकता होती का? राज्यपालांना एक पत्र व यादी पाठवून स्वस्थ राहणे अधिक शोभादायक व उचित ठरले असते. वसंतरावदादा घायकुतीला येऊन काहीच्याबाही करतच होते. जनतानेत्यांकडून अधिक तटस्थता व दमदारपणा अपेक्षित होता. तो व्यक्त झाला नाही

म्हणून पाल चुकचुकते आहे. या मंडळींना हवे आहे तरी काय ? केवळ सत्ताबदल की समाजपरिवर्तन ? परिवर्तन हवे असेल तर चाल वेगळी हवी. रचना वेगळी हवी. पुढचा काळ तर आणखीच कठीण आहे. भुसभुशीत पक्षसंघटना इंदिरेच्या वावटळीपुढे किती दिवस टिकाव धरू शकेल ? वसंतरावदादांना नामोहरम करण्यात आता फारसा पुरुषार्थ उरलेला नाही. तिरपुडे ते काम करीत राहतील. सामना इंदिरेशी आहे आणि त्यासाठी प्रबळ पक्षसंघटन, ठोस विकास-मोहिमा यांची आवश्यकता आहे. अजून वेळ गेलेली नाही. ' जनता-विकास मोहीम क्रमांक एक 'ची लोक आतुरतेने वाट पाहत आहेत. तिकडे लक्ष पुरविणार की राजभवनावर खेटे घालत राहणार ? □

## मतदार-यादी गोंधळाची चौकशी हवी

□ २५ फेब्रुवारीस मी मतदानासाठी निवडणूककेन्द्रावर गेले. शिवाजीनगर हा माझा मतदारसंघ. लोकसभेच्या निवडणुकीच्या वेळी मी स्वतःचे नाव अर्ज भरून नोंदवून घेतले होते. ह्या वेळी मी त्याच मतदारसंघात पण वेगळ्या जागी होते. मतदारसंघ तोच असल्याने मी यादीत नाव तपासण्याची तसदी घेतली नाही. २५ ता.स मत देण्यास गेले पाहाते तो नावच नाही ! एवढेच नव्हे तर ' महिलानिवास '-जिथे मी राहात असे-मधल्या बहुतेक स्त्रियांची नावे नाहीत. १९७७ साली लोकसभेच्या निवडणुकीत मतदान केलेल्या स्त्रियांची देखील नावे नाहीत ! माने, कांबळे, राऊत, देशपांडे, ब्रह्मे अशी पाच नावे फक्त यादीत होती. पैकी कांबळे सोडूनही गेल्या होत्या ! ब्रह्मेबाईंनी १९७७ साली त्यांचे नाव वगळले गेल्यामुळे अर्ज केला होता. अजून निवासातच असणाऱ्या स्त्रियांची नावे जर नव्हती तर आमच्यासारख्या नुकत्याच सोडून गेलेल्यांची काय कथा ? पण असे म्हणावे तर मग कांबळे ह्यांचे काय ? १९७७ साली मतदान केलेले व १९७८ साली नाव यादीत नसल्याने बुचकळ्यात पडलेले बरेच लोक मला ह्या काळात भेटले.

१९७७ सालीही असलाच संशयास्पद गोंधळ झाला होता. त्या वेळीही असे बरेच लोक भेटले ज्यांची वर्षानुवर्षे मतदारयादीत असणारी नावे अचानक नाहीशी झाली होती. जनता पक्षाच्या अभूतपूर्व यशाच्या धुंदीत ते प्रकरण नजरेआड करण्याची चूक आम्ही मतदारांनी केली व ह्या खेपेला ती आम्हालाही भोवली ! एकट-दुकट माणसाचे नाव गळले तर तो अपघात, नजरचूक म्हणता येईल, पण जेव्हा चाळीच्या चाळी 'गळतात' तेव्हा तो अपघात कसा म्हणायचा ? फौजदारी कायद्यात तर हलगर्जीपणा किंवा निष्काळजीपणादेखील एका पातळीच्या वर गेला की त्याला शिक्षा असते !

१९७७ च्या मतदारांच्या यादीत एकट्या शिवाजीनगरसंघातून दहा हजार नावे गळल्याचे ऐकिवात आहे. आडनावे टिपून जातवार टाळली असेही ऐकले. पुण्यासारख्या शहरात, जिथे वस्ती संमिश्र नसून जातिसमूहाने असते व ज्या देशाच्या राजकारणात अमुक जातीचे / धर्माचे लोक अमुक पक्षाला पाठिंबा देणार असे आडाखे बांधले जातात तिथे एकही बोलवा खोटी कशी म्हणता येईल ?

' तुम्ही चौकशी का केली नाहीत ? ' हा ठपका आता मतदारांना देऊन उपयोगी नाही. कारण तुरळक नावे सुटल्याची आमची तक्रार नसून बरीच नावे सोडल्याची आम्हाला शंका आहे. ह्या संशयाची छाननी व्हायला हवी व तो जर खरा असला तर ह्या प्रकरणास जबाबदार असणारांना जबर शिक्षा व्हायला हव्यात.

उत्तर भारतात अशी पद्धत पडली होती की दहा-पाच गुंडांनी केन्द्रावर जाऊन तेथल्या अधिकाऱ्यांकडून १००-२०० मते जवळजवळ हिसकावूनच घ्यायची, व असे पुनःपुन्हा करून मतदान आपल्या बाजूने करून घ्यायचे. हा प्रकार केवळ खेड्यातच होत नसून धनबादसारख्या शहरातही होत असे हा माझा व्यक्तिगत अनुभव आहे. महाराष्ट्रात जमीनदारी पद्धतीची दंडुकेशाही चालणार नाही म्हणून नावेच न नोंदवण्याचा जास्त Subtle उपाय निदान शहरांपुरता तरी काढण्यात आला आहे की काय ? कारण खेडी कदाचित् भारतभर सारखीच निघतील! राजकीय बंडखोरांना छळ-छावण्यांऐवजी वेड्यांच्या इस्पितळात पाठवण्यासारखीच सुधारणा झाली !

जनतापक्षाने ह्या संशयास्पद प्रकारचा ताबतोब पाठपुरावा करायला हवा. कुठल्याही मतदारसंघात नोंदलेले मतदार किती व नोंद न झालेले किती ह्याची यादी बनवावी व जर दुसरी यादी बरीच मोठी असेल (मतदारसंघाच्या १.४ टक्क्यापेक्षा जास्त) तर ही नावे का गळली ह्याची कसून चौकशी करावी. तरच मतदानाला अर्थ आहे, राहील. कॉंग्रेसची जमीनदारी संपुष्टात आणणे किती कठीण आहे हे ह्या लहानशा प्रकारावरून सुद्धा कळून येते.

**डॉ. वसुधा धागमवार, पुणे**

## छात्रयुवा आणि मतदारजागृती

□ गेल्या वर्षी लोकसभा निवडणुकीत छात्र-युवा-संघर्ष वाहिनीच्या कार्यकर्त्यांनी सर्वत्र हिरीरीने जनता पक्षाचा प्रचार केला. कारण त्या वेळी लोकशाहीच्या जीवनमरणाचा प्रश्न देशापुढे उभा ठाकला होता.

आणीबाणी संपुष्टात येऊन नागरी स्वातंत्र्याची पुनस्थापना झाल्यावर मात्र संघर्ष-वाहिनीला कोणत्याही एका राजकीय पक्षाची बाजू घेण्याचे कारण नव्हते. म्हणूनच महाराष्ट्रातल्या विधानसभा निवडणुकीत तिने तटस्थ राहायचे ठरविले.

परंतु तटस्थतेला निष्क्रियतेची अवकळा येऊ नये म्हणून काही शहरात लोकशाहीच्या विकासासाठी अत्यंत मूलभूत अशा प्रश्नांवर लोकजागृती घडवून आणण्याची योजना आखली गेली.

अमरावती शहरात संघर्षवाहिनीच्या २५-३० कार्यकर्त्यांचा उत्तम संच आहे. निवडणुकीच्या दहा दिवस आधी त्यांनी शहरातल्या प्रमुख भिंतींवर या घोषणा रंगविल्या-

**—मतदारांनी,**
**—जातपात वापरतील**
**—पैसे चारतील**
**—दारू पाजतील**
**—दादागिरी करतील**
**—असे उमेदवार हाणून पाडा !**
**—आणीबाणीच्या समर्थकांना हाणून पाडा !**
**—आमदार खासदारांना परत बोलावण्याचा जनतेचा अधिकार (Right to Recall) मान्य न करणाऱ्या व आपली मालमत्ता जाहीर न करणाऱ्या उमेदवारांना मते देऊ नका !**

दुसऱ्या दिवसापासून अमरावतीच्या मध्यभागी असलेल्या राजकमल चौकात वाहिनीची भूमिका लोकांना समजावी यासाठी एक फळा लावण्यात आला. Right to Recall ची आवश्यकता, उमेदवारांनी मालमत्ता जाहीर का करावी, आजच्या निवडणूकपद्धतीतले दोष इत्यादी विषयांवर जनप्रबोधनासाठी २५ फेब्रुवारीपर्यंत रोज या फळ्याचा वापर करण्यात आला. येणारे-जाणारे नागरिक हमखास या फळ्यावरील नवनवीन मजकूर रोज वाचायचे व त्यातील मुद्द्यांवर आपसात चर्चा करायचे.

सतरा व अठरा फेब्रुवारीला कार्यकर्त्यांनी एक मेटॅडोर गाडी भाड्याने घेतली व तिला व्यंगचित्रांनी सजविले. आजच्या महागड्या व कर्कश निवडणूकपद्धतीत सामान्य मतदार कसा हतबुद्ध झाला आहे याचे सुंदर रेखाटन व्यंगचित्रांनी साधले होते. अमरावतीच्या निरनिराळ्या वॉर्डांतून ही मेटॅडोर दोन दिवस फिरली. व्यंगचित्रे जागोजाग गर्दीला निमंत्रण देत. पुरेसे लोक जमले की, कार्यकर्ते लगेच चौक-सभा सुरू करीत. उमेदवारांनी संपत्ती जाहीर करावी व Right to Recall मान्य करावा या दोन मागण्यांमागील भूमिका ते विषद करीत. अशा शंभरावर चौक-सभा दोन दिवसांत पार पडल्या.

१९ फेब्रुवारीला वाहिनीच्या साठ कार्यकर्त्यांनी या दोन मागण्यांसाठी राजकमल चौकात दिवसभराचे लक्षवेधी उपोषण केले. इंदिरा काँग्रेसच्या उमेदवाराने उपोषण मंडपास भेट देऊन दोन्ही मागण्या मान्य असल्याचे सांगितले व रजिस्टरवर स्वाक्षरीही दिली.

नंतरचे दोन दिवस वाट बघण्यात गेले. जनता पक्षाच्या जिल्हा सचिवांनी कार्यकर्त्यांना असे आश्वासन दिले होते की, आमचा उमेदवार तुमच्या दोन्ही मागण्या जाहीररीत्या मान्य करील; पण एकानेही आश्वासन पाळले नाही.

दि. २२ च्या रात्री कार्यकर्ते पुन्हा जमले व त्यांना एक अभिनव शक्कल सुचली.

तेवीस फेब्रुवारीला सायंकाळी पाच वाजता प्रचारमोहीम बंद होणार. त्यापूर्वी दोन वाजता वाहिनीच्या कार्यकर्त्यांनी एक मिरवणूक काढली. पुढे पुढे ताशेवाले, त्यांच्यामागे एक हातगाडी, हातगाडीवर एक उंच खुर्ची. खुर्चीत एक कार्यकर्ता बसलेला. त्याच्या डोक्यात सर्कशीतल्या विदुषकाला असतो तसा गोल उंच टोप. या टोपावर उमेदवार असं लिहिलेलं. उमेदवाराच्या हाती दारूची बाटली. तो रस्ताभर माईकमधून ओरडत होता—'मतदारबंधूनो, मला माझी मालमत्ता जाहीर करण्याची लाज वाटते, मी भ्रष्ट आहे; पाच वर्षांतून एकदाच मी तुम्हाला तोंड दाखवतो; जात सांगून मत मागतो; दारू पाजतो—म्हणून मलाच मते द्या !' ही विलक्षण मिरवणूक बघायला रस्तोरस्ती तोबा गर्दी व्हायची. प्रत्येक चौकात मिरवणूक थांबवून वाहिनीचे महाराष्ट्राचे संयोजक अमर हबीब एक छोटेखानी भाषण देत. अखेर राजकमल चौकात मिरवणूक पोचली तेव्हा पावणेपाच वाजले होते. तेथे पुन्हा दीड हजार लोकांपुढे चंद्रकला वानखेडे व अमर हबीब बोलले व ठीक पाच वाजता मिरवणूक विसर्जित केली.

निवडणूक-पूर्व दहा दिवसांत निरनिराळ्या माध्यमांचा वापर करून संघर्षवाहिनीच्या कार्यकर्त्यांनी अमरावती शहरातल्या राजकीय वातावरणात निश्चितच खळबळ माजविली. पक्षोपक्षांच्या उमेदवारांनी चालविलेल्या प्रचाराच्या गदारोळात वाहिनीचा हा आवाज म्हणजे दबलेल्या मतदाराचा आवाज होय, अशी प्रतिक्रिया अनेक प्रमुख नागरिकांनी व्यक्त केली. हा आवाज या निवडणुकीत प्रभावी ठरला नसेल, तरीही मतदारांमध्ये वैचारिक जागृती आणण्यासाठी यासारखे उपक्रम सातत्याने होत रहाणे आवश्यक वाटते.

**किशोर देशपांडे**


**तीन राजहंस प्रकाशने**


राजहंस प्रकाशन पुणे

१०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०

**फिडेल, चे आणि क्रांती**
अरुण साधू । सात रुपये

**आणि ड्रॅगन जागा झाला**
अरुण साधू । चवदा रुपये

**पूर्णिया**
अनिल अवचट । सहा रुपये



# यमुनेच्या पुलाखालून बरेच पाणी वाहून गेलेले आहे.

□

## दिल्ली दौऱ्यावर आधारित खास लेखमाला

□

सदाशिव पेंठकर

□

### पूर्वसूत्र...

पुन्हा एकदा दिल्लीच्या वाटेवर.
बरोबर एक वर्षानंतर.

कालामध्ये अवघा बारा महिन्यांचा, पण देशातल्या राजकीय वातावरणात केवढा बदल घडून आलेला आहे !

गेल्या वर्षीच्या मार्च महिन्याने हुकुमशाहीचा अस्त पाहिला. हे संकट कायमचे नाहीसे झाले आहे असे तेव्हा वाटत होते. इंदिरा गांधींसंबंधी बोलताना दिल्लीतील राजकीय पंडित मोठ्या आत्मविश्वासाने सांगत होते – ' You can write her off. '

आज सगळीकडे एकच भयग्रस्त प्रश्न विचारला जात आहे, ' Will she stage a comeback ?'

याच प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी दिल्लीला निघालो आहे.

दिल्लीचा विचार मनात आला की २४ मार्च, १९७७ हा दिवस स्पष्टपणे नजरेसमोर येतो.

दुसरे स्वातंत्र्ययुद्ध चार दिवसांपूर्वीच संपले होते. इंदिरा गांधी निवडणुकीत पराभूत झाल्या आहेत ही अनपेक्षित वार्ता २० मार्चच्या रात्रीने सांगितली. दुसऱ्या दिवशी हेही कळले की, काँग्रेसला बहुमत मिळत नाही !

निवडणुकांपूर्वीचा निरीक्षकांचा अंदाज पार कोलमडला होता. काँग्रेस तीनशे आणि जनता पक्ष दोनशेचाळीस अशी या निरीक्षकांनी लोकसभेच्या जागांची वाटणी केली होती. प्रत्यक्षात घडले वेगळेच ! जनता पक्षाला निर्विवाद बहुमत मिळाले होते आणि काँग्रेसला अवघ्या दीडशे जागांवर समाधान मानावे लागले होते !

भारतासारख्या गरीब देशातल्या अडाणी समजल्या जाणाऱ्या मतदारांनी हा चमत्कार करून दाखविला होता.

स्वतःची सत्ता स्थिरपद करण्यासाठी इंदिरा गांधींनी अंतर्गत आणीबाणीचे हत्यार उपसले; पण बूमरँगप्रमाणे ते त्यांच्यावरच उलटले. दोन महिन्यांपूर्वी चार पक्षांच्या एकत्रीकरणातून जन्मास आलेला जनतापक्ष सत्तारूढ झाला.

हीच आनंददायी वार्ता २४ मार्चची सकाळ सांगत होती.

उजाडण्यापूर्वीच दिल्लीतील सारे रस्ते राजघाटाकडे वाहू लागले होते. बरोबर सात वाजता उगवत्या सूर्यनारायणाला साक्षी ठेवून

महात्माजींच्या समाधीसमोर जनता पक्षाचे संसदसदस्य नि:स्वार्थ जनसेवेची आणि स्वच्छ प्रशासनाची शपथ घेणार होते.

अभूतपूर्व चैतन्याने भारताची राजधानी न्हाहून निघाली होती.

मानवी स्वातंत्र्य आणि व्यक्तिमात्राची प्रतिष्ठा यांच्यावर अतूट श्रद्धा बाळगणाऱ्यांच्या दृष्टीने एका भीषण संघर्षाचा अंत झाला होता. भारतात पुनश्च लोकशाही अवतरली आहे याची ग्वाही ती सोनेरी सकाळ देत होती.

शपथविधीचा सोहळा आटोपला आणि संसदसदस्य गांधी शांति प्रतिष्ठानाकडे मार्गस्थ झाले.

पंतप्रधानपदावर कोणाची निवड होते यासंबंधीची उत्सुकता शिगेला पोहोचली होती. मोरारजी देसाई की जगजीवनराम असा पेच निर्माण झाल्याची बातमी बाहेर आली तेव्हा मघाचा उत्साह मावळला आणि एका चमत्कारिक शंकेने सगळ्यांना अस्वस्थ केले.

दुपारी संसदेच्या मध्यवर्ती सभागृहात पुन्हा बैठक भरली तेव्हा तर अफवांचे पीकच आले होते. जगजीवनराम त्या बैठकीस आले नाहीत. त्यामुळे सत्ताग्रहण करण्याचा क्षण अवतरला असताना जनता पक्षातील एकजूट भंग पावते की काय या शंकेची पाल मनात चुकचुकून गेली. चार वाजता मोरारजी देसाई यांचा शपथविधी झाला. त्यातही जगजीवनराम हजर राहिले नाहीत.

त्यानंतरचे शुक्रवार, शनिवार आणि रविवार हे तीन दिवस असे गेले, की काय घडणार आहे याचा काहीच थांगपत्ता लागत नव्हता. चंद्रशेखर तातडीने मुंबईस गेले. त्यांनी जयप्रकाश नारायण यांची भेट घेतली. जयप्रकाशबाबूंनी जगजीवनरामना फोन केला आणि बाबूजींनी पहाटे तीन-साडेतीनच्या सुमाराला त्यांच्या निवासस्थानासमोर जमलेल्या नागरिकांना सांगितले, 'मी मंत्रिमंडळात प्रवेश करणार आहे !'

राजधानीने समाधानाचा निश्वास सोडला !

त्या चार दिवसांतील धावपळ, जॉर्ज फर्नांडिस आणि राजनारायण यांनी मंत्रिमंडळात यायला नकार दिल्यानंतर लोकांनी त्यांना वेढा घालून व्यक्त केलेला संताप, जगजीवनराम आणि हेमवतीनंदन बहुगुणा यांनी सुरुवतीला घेतलेला अडवणुकीचा पवित्रा, त्यामुळे निर्माण झालेले सचिंत वातावरण-सारे काही आज स्पष्टपणे डोळ्यासमोर येत आहे.

वर्षभरात यमुनेखालून बरेच पाणी वाहून गेले आहे.

जनता पक्षाचे मंत्रिमंडळ अधिकारावर आल्यानंतर त्याला पहिला विचार करावा लागला तो राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीचा. लोकसभा हातात आली असली तरी राज्यसभेत आणि राज्यांच्या विधानसभांमध्ये काँग्रेसचे प्रचंड बहुमत होते. त्यामुळे जनता पक्षाचा उमेदवार विजयी होणे शक्यच नव्हते. म्हणून ज्या राज्यामध्ये काँग्रेसचा पार धुव्वा उडालेला आहे त्या राज्यातील विधानसभांच्या निवडणुकी घेण्याचे ठरले; परंतु मंत्रिमंडळाच्या या निर्णयावर हंगामी राष्ट्रपती बी. डी. जत्ती सही करीनात.

पुन्हा एक पेचप्रसंग.

शेवटी मोरारजी देसाई यांनी जत्तींना कळविले, 'मंत्रिमंडळाच्या ठरावावर आपली ताबडतोब सही मिळाली नाही तर मी आकाशवाणीवरून भाषण करून मंत्रिमंडळाच्या राजीनाम्याचा आणि लोकसभेच्या फेरनिवडणुकीचा निर्णय जाहीर करीन !'

ही कठोर मात्रा अचूक लागू पडली. चोवीस तासांच्या दिरंगाईनंतर जत्तीमहाशयांनी नऊ राज्यांच्या विधानसभा-निवडणुकीचा आदेश जाहीर केला.

पंजाबपासून बंगालपर्यंत पुन्हा निवडणुकीची धामधूम सुरू झाली. तीन महिन्यांपूर्वीची जनता लाट विरून गेली आहे, असे काही निरीक्षक सांगू लागले. पुन्हा एकदा त्यांचा अंदाज चुकला. काँग्रेसला कोणत्याही राज्यात सत्ता टिकविता आली नाही. सात राज्यांमध्ये जनता पक्ष अधिकारावर आला. राष्ट्रपतिपदासाठी नीलम संजीव रेड्डी यांची उमेदवारी निश्चित करण्यात आली.

ही निवडणूक अविरोध व्हावी यासाठी इतर पक्षांशी बोलणी सुरू झाली. काँग्रेसचे अध्यक्ष ब्रह्मानंद रेड्डी आणि त्या पक्षाचे संसदेतील नेते यशवंतराव चव्हाण यांनी, संजीव रेड्डी यांच्या उमेदवारीचा आपला पक्ष पुरस्कार करील असे आश्वासन देताच इंदिरा गांधींचा जळफळाट झाला. याच संजीव रेड्डींच्या उमेदवारीवरून त्यांनी आठ वर्षांपूर्वी पक्ष फोडला होता. त्यांची उमेदवारी आपल्या पक्षाने मान्य करावी हे पूर्वीचे काहीही न विसरणाऱ्या इंदिरा गांधींना रुचण्यासारखे नव्हते.

लोकसभेच्या निवडणुकीत पराभूत झाल्यापासून इंदिरा गांधी प्रत्यक्ष राजकारणाच्या परिघापासून थोड्याशा दूर गेल्या होत्या. आपल्या या तात्पुरत्या राजकीय संन्यासाला विराम देण्याचा त्यांनी निर्णय घेतला यामागे संजीव रेड्डी यांची राष्ट्रपतिपदावर अविरोध निवड हे एक प्रमुख कारण ठरले. रेड्डी आणि चव्हाण महत्त्वाचे निर्णय करताना आपली उपेक्षा करीत आहेत हे त्यांना या वेळी प्रकर्षाने जाणवले आणि त्यांनी काँग्रेसची सूत्रे पुन्हा स्वतःच्या हातात केंद्रित व्हावीत या दिशेने पावले टाकायला प्रारंभ केला.

प्रथम त्या पवनारला गेल्या आणि त्यांनी विनोबाजींचा आशीर्वाद मिळविला. बिहारमधल्या बेलछी या खेड्यातील अकरा हरिजनांना जिवंत जाळण्यात आल्याची घटना घडताच त्या लगेच तिकडे गेल्या. मुसलमान, हरिजन आणि आदिवासी यांच्या उद्धाराची आपल्या स्वतःलाच काय ती कळकळ आहे हे दाखविण्यासाठी इंदिरा गांधींना बेलछी-दौरा उपयोगी पडला. यशवंतराव चव्हाण बेलछीला जाणार आहेत असे प्रसिद्ध होताच, त्यांच्या आधीच इंदिरा गांधी तिकडे जाऊन आल्या. शेवटी यशवंतरावांनी आपला संकल्पित दौरा रद्द केला. इंदिरा गांधींचा प्रमुख नेतृत्वविशेष समजावून घेण्याच्या दृष्टीने त्यांचा बेलछी-दौरा महत्त्वाचा ठरतो वातावरण आपल्याला कितीही प्रतिकूल असो आणि परिस्थितीने कितीही विपरीत वळण घेतले असले तरी प्रसिद्धीचा झोत आपल्यावर पडला पाहिजे यासाठी कोणताही धोका पत्करण्याची इंदिरा गांधींची तयारी असते. स्वभावातील ही आक्रमकताच पराभवाच्या काळात त्यांच्या साहाय्याला धावून येते. बेलछीमध्ये वाहन जाऊ शकत नाही हे कळताच त्या माघारी फिरल्या नाहीत, त्या हत्तीवर स्वार झाल्या आणि त्या लहानशा खेड्यातून त्यांनी फेरफटका मारला. वस्तुतः आणीबाणीच्या काळातील इंदिराजींच्या अघोरी कारभाराच्या कितीतरी कहाण्या त्या वेळेस प्रसिद्ध झाल्या होत्या. एवढी मानखंडना झालेल्या दुसऱ्या एखाद्या व्यक्तीने राजकारणाला कायमचा रामराम ठोकला

असता. बेलछी-दौरा आपल्या राजकीय पुनरागमनाला उपकारक ठरेल याचा मनाशी निर्णय होताच इंदिरा गांधींनी तातडी केली आणि जे श्रेय चव्हाण घेऊ इच्छित होते ते इंदिराजींच्या पदरात पडले.

बेलछी-दौऱ्यानंतरची इंदिरा गांधींच्या दृष्टीने महत्त्वाची घटना म्हणजे तीन ऑक्टोबरला त्यांना झालेली अटक. इंदिरा गांधी सत्तेपासून दूर गेलेल्या असल्या तरी त्यांची खास माणसे अजून केंद्रीय सचिवालयातील मोक्याच्या स्थानांवर बसून आहेत. त्यांच्या-करवी सी. बी. आय. चा अटकेचा बेत त्यांना अगोदरच कळला होता. त्यामुळे त्यांनी अटकेच्या वेळी 'मला बेड्या घाला!' असे म्हणत हात पुढे करून सी. बी. आय. च्या अधिकाऱ्यांना चक्रावून सोडले. यावेळी छायाचित्रकारांचा ताफा आपल्या निवासस्थानी हजर असेल याचीही त्यांनी तरतूद केली होती. त्यामुळे इंदिरा गांधींच्या अटकेला दुसऱ्या दिवशी सचित्र प्रसिद्धी लाभली. ४ ऑक्टोबरला इंदिरा गांधींना न्यायालयात हजर करण्यात आल्या-नंतर सी. बी. आय. च्या वतीने कोणतेच निवेदन सादर करण्यात आले नाही आणि त्यामुळे न्यायालयाने त्यांची सुटका केली.

कांग्रेसकारिणीने तातडीची बैठक घेऊन इंदिरा गांधींच्या अटकेचा निषेध केला आणि या अटकेमुळे निर्माण झालेल्या परि-स्थितीचा विचार करण्यासाठी अखिल भारतीय कांग्रेस महासमितीचे तातडीचे अधिवेशन बोलाविले. इंदिरा गांधी यांच्या पाठीशी सारा पक्ष उभा आहे हे दाखविण्याकरिता ब्रह्मानंद रेड्डी यांनी हे अधिवेशन भरविले होते; परंतु इंदिरा गांधींनी रेड्डी यांच्या नेतृत्वाची रेवडी उडविण्यासाठीच या अधिवेशनाचा वापर केला. पक्षाध्यक्ष व्यास-पीठावर बसलेला असताना गुंडुराव, वसंत साठे आदी इंदिराजींचे समर्थक अध्यक्षासंबंधी निंदाव्यंजक भाषेत बोलत होते. गुंडुराव किंवा साठे यांच्या अशा तऱ्हेच्या कुत्सित उद्गारांमागे कोणाची चिथावणी उभी आहे हे तेथे जमलेल्यांना माहीत होते. बरेचजण झाल्या प्रकारासंबंधी आपापसात बोलताना नापसंती व्यक्त करीत होते; परंतु इंदिरा गांधींना जाब विचारण्याची कोणालाही हिंमत झाली नाही. ब्रह्मानंद यांच्यावर हल्ला करण्यासाठी इंदिरा गांधींनी स्वीकारलेला मार्ग निश्चितच अशिष्ट होता; परंतु इंदिरा गांधींच्या विचारधारेत शिष्ट-अशिष्टाचा विवेक बसतच नाही. आपल्या प्रति-स्पर्ध्याला नामोहरम करण्यासाठी त्या कोणतीही हीन पातळी गाठू शकतात. खोटे आरोप करणे हा तर त्यांच्या स्वभावाचा अविभाज्य भागच झालेला आहे. जनसंघ आणि स्वतंत्र पक्ष यांच्याशी संगनमत केल्याचा आरोप करून त्यांनी १९६९ मध्ये पक्षाध्यक्ष निजलिंगप्पा यांना बदनाम केले होते. ब्रह्मानंद रेड्डी यांना पक्षाध्यक्षपदावरून दूर करण्यासाठी इंदिरा गांधींनी त्यांच्यावर जनता पक्षाशी हातमिळवणी केल्याचा आरोप आरंभिला.

त्यातूनच इंदिरा गांधींनी पुढचे पाऊल टाकले. ब्रह्मानंद रेड्डी यांची अध्यक्षपदावरून उचलबांगडी करण्याकरिता अ. भा. कांग्रेस महासमितीचे खास अधिवेशन बोलाविण्याची मागणी पुढे आली. या मागणीपत्रकावर बहुसंख्य सभासदांच्या सह्या आहेत हा इंदिरा गांधींचा दावा म्हणजे एक धादांत असत्य होते. हा दावा सिद्ध करून दाखविण्याचे आव्हान त्यांनी खुबीने टाळले. इंदिरा गांधींच्या मेहेर-बानीमुळेच ब्रह्मानंद रेड्डी अध्यक्षपदावर आरूढ झाले होते; परंतु देवकांत बरुआ ज्याप्रमाणे इंदिरा गांधींच्या तंत्राने वागत असायचे तशी नुसती होयबाची भूमिका घ्यायलासुद्धा ब्रह्मानंद रेड्डी यांनी नकार दिला. रेड्डींची ही मर्यादित स्वतंत्र वृत्तीही इंदिराजींना सहन झाली नाही. म्हणून त्यांनी आपल्या समर्थकांकरवी खास अधिवेशनाची मागणी पुढे रेटायला प्रारंभ केला. कोणत्याही परिस्थितीत या मागणीपुढे मान तुकवायची नाही असे रेड्डी यांनी ठरविल्यानंतर गेल्या १ जानेवारीला इंदिरा गांधींनी आपल्या समर्थकांचा मेळावा भरवून, आपणच कांग्रेसच्या अध्यक्षा झाल्याचे त्यांनी जाहीर करून टाकले.

इंदिरा गांधींनी आठ वर्षांत दोनदा पक्ष फोडला.

१९६९ मधल्या फाटाफुटीच्या वेळी त्या पंतप्रधान होत्या. त्यामुळे त्या वेळचे त्यांचे वर्तन कितीही गर्हणीय असले तरी कांग्रेसजनांनी ते खपवून घेतले. इंदिरा गांधींचा या वेळचा जुगार खरोखरच धोका-दायक होता. सत्तेवर नसतानाही त्यांनी ब्रह्मानंद रेड्डी यांच्याविरुद्ध झुंज घेतली. या जुगारामध्ये त्यांना सारे काही गमवावे लागेल असे वाटत होते; परंतु २५ फेब्रुवारीला झालेल्या विधानसभांच्या निवड-णुकीने इंदिरा गांधी यांना पुन्हा बळ प्राप्त करून दिले आहे. कर्नाटक आणि आंध्रप्रदेश या दोन राज्यांत रेड्डी-कांग्रेसचा पुरता बोजवारा उडाला आहे. दोन्ही ठिकाणी इंदिरा कांग्रेसची मंत्रिमंडळे अधिकारा-वर आलेली आहेत. या यशामध्ये इंदिरा गांधी यांच्या लोकप्रियते-इतका देवराज अरस आणि चेन्ना रेड्डी यांच्या प्रभावाचाही भाग आहे हे खरे असले तरी हे यश इंदिरा गांधींना नवे सामर्थ्य द्यायला नक्कीच सहाय्यभूत होणार आहे.

महाराष्ट्रात इंदिरा कांग्रेसशी समझोता करून रेड्डी कांग्रेसने आपल्या लाचारीची तर कबुली दिलेलीच आहे. शिवाय हा पक्ष स्वतंत्रपणे उभा राहू शकत नाही हेही दिसून आलेले आहे. पहिल्या दुफळीनंतर संघटना-कांग्रेस या नावाने एक लहानसा गट अस्तित्वात होता. तसा एखादा मामुली गट या वेळीही वेगळा राहील; परंतु पक्ष म्हणून रेड्डी कांग्रेसचे अस्तित्व संपुष्टात आणण्याची प्रक्रिया महाराष्ट्रातील संमिश्र मंत्रिमंडळाच्या बनावाने सुरू झालेली आहे आणि ती कोणालाच रोखता येणार नाही. रेड्डी कांग्रेसप्रमाणे उजव्या कम्युनिस्ट पक्षाचाही या निवडणुकीत खातमा झालेला आहे.

जनता पक्ष, इंदिरा कांग्रेस आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष या तीन प्रमुख पक्षांभोवतीच यापुढचे भारतीय राजकारण केंद्रित होणार आहे. त्यातही मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे बळ पूर्व भारतापुरतेच मुख्यत: सीमित आहे. अशा परिस्थितीत हुकूमशाही वृत्तीच्या इंदिरा कांग्रेसशी लढत देण्याची जबाबदारी जनता पक्षावरच येऊन पडते.

वर्षभराच्या अवधीत पुन्हा डोके वर काढू पाहणारी ही हुकूम-शाही जनता पक्ष कोणत्या सामर्थ्याच्या आणि कार्यक्रमाच्या आधारा-वर रोखणार आहे हाच आजचा सर्वांत महत्त्वाचा सवाल आहे.

जनता पक्षाला या कार्यात यश आले नाही तर पुन्हा २६ जून, १९७५ उजाडायला वेळ लागणार नाही हा खरा धोका आहे.

या लाखमोलाच्या प्रश्नाचे उत्तर शोधायचा प्रयत्न केला पाहिजे. त्यासाठीच तर पुन्हा एकदा दिल्लीच्या वाटेवर.

[ क्रमशः ]

# अवती - भवती

शरद कृष्णन्

## □ समुद्राच्या तळाशी गेलेल्या जहाजाची कहाणी

आकाशी झेपावलेले एअर इंडियाचे प्रचंड जम्बो मुंबईजवळ समुद्रात कोसळल्यानंतर केवळ पाचच दिवसांनी आणखी एक कडवट बातमी हाती आली. भारतीय जहाज महामंडळाचे एम्. व्ही. चंद्रगुप्त हे जहाज पॅसिफिक समुद्रात वादळाच्या तडाख्यात सापडून नाहीसे झाले. नाहीसे झाले अशासाठी म्हणायचे की, अमेरिकन शोधपथकांनी शोध घेऊनही हाती माणसे किंवा माल काहीही लागले नाही ! जहाज महामंडळाच्या १६ वर्षांच्या कारकीर्दीत पहिल्या तीन अपघाताची नोंद झाली. भारतीय मालवाहू जहाजाच्या वाट्याला आजवर कधीही न आलेल्या या प्रपाती अपघातामुळे ६९ कर्मचारी आणि ३४ हजार टन गहू यांना जलसमाधी मिळाली. जगामधील सगळ्यांत मोठ्या आणि खोल अशा या महासागरामध्ये चंद्रगुप्त हे ३७,०९० टनी वजनाचे आणि ज्याचा पाच कोटी रुपयांचा विमा उतरविण्यात आला होता असे जहाज बघता बघता नाहीसे झाले ! चार दिवस तपास झाला. पुढे हाती काही लागत नाही म्हणून तो थांबविण्यात आला. वृत्तपत्रांतही चार–दोन दिवस बातम्या आल्या. पुढे त्याही थंडावल्या. आता महामंडळ नुकसानभरपाई देण्याच्या मागे आहे. तीही यथावकाश देण्यात येईल; पण जी प्रचंड हानी झाली आहे त्याचे पडसाद भारतीय जहाजव्यवसायामध्ये आजही घुमत आहेत.

२५ डिसेंबरला बाहेर पडल्यापासून चंद्रगुप्तने तीन हजार दोनशे किलो मीटर्सचा प्रवास केला आणि त्यानंतर ते पॅसिफिकमधील वादळामध्ये सापडले. ६०–६५ फूट उंचीच्या लाटा उसळत होत्या आणि प्रचंड घोंघावत्या वाऱ्याने ताशी ऐंशी मैलांचा वेग घेतला होता आणि जहाज संकटात गुरफटत होते. सकाळी ७ वाजून १० मिनिटांनी जहाजाने 'आमचे प्राण वाचवा !' असे सांगणारे वृत्त बिनतारी यंत्रणेद्वारा प्रक्षेपित केले. त्यानंतर जहाजावरील संकटाचे स्वरूप अधिकाधिक गंभीर होत गेले. पहिल्या संदेशानंतर केवळ दीड तासाने दुसरा संदेश पाठविण्यात आला. परिस्थिती गंभीर असल्याचे त्या संदेशात नमूद करण्यात आले होते. जहाज बुडणार हे त्याच वेळी स्पष्ट झाले. आठ–सेहेचाळीसच्या संदेशाप्रमाणे जहाज बुडत आहे असे कळवण्यात आले. त्याचप्रमाणे लाइफबोटस् देण्यात येत असल्याचेही कळविण्यात आले. शेवटचा अपूर्ण संदेश आठ–त्रेपन्नला नोंदला गेला आहे. केवळ तीनच शब्द असलेल्या या संदेशाबरोबरच जहाजाचा संपर्कही तुटला आणि त्यानंतर वृत्त आले ते सर्वनाश झाल्याचे ! अमेरिकन किनारारक्षकदलाने दोन विमाने रवाना केली. एक होनोलुलूहून सुटले, तर दुसरे अलास्काहून. जहाजावरचा शेवटचा अपूर्ण संदेश सकाळी आठ वाजून त्रेपन्न मिनिटांनी आला होता, तर शोध घेण्यासाठी निघालेले पहिले विमान जहाज जेथे होते त्या परिसरात दुपारी तीन वाजून तीस मिनिटांनी पोचले. जहाज बुडू लागल्यापासून चांगले सहा–साडेसहा तास होऊन गेले होते. दुसरे विमान चार वाजून चव्वेचाळीस मिनिटांनी पोचले. दोन्ही विमानांनी जहाज आपल्याला दिसल्याची नोंद केली आहे. तथापि अपुरा प्रकाश असल्याने विमानांना अपेक्षित सहकार्य देता आले नाही. त्यानंतर अमेरिकन नौदलातर्फे आणखी शोध घेण्यात आला. तथापि वादळी हवामान आणि अपुरा प्रकाश यामुळे तपासाला फारसा अर्थ राहिला नव्हता. तरीही नौदलाने चिकाटीने शोध चालू ठेवला. दुसऱ्या दिवशी आणखी पाच विमाने बाहेर पडली. तिसऱ्या दिवशी सात तर अपघात झाल्यापासून चौथ्या दिवशी नऊ विमाने पाठविण्यात आली. या विमानांनी जहाज बुडालेल्या परिसराचा कसून शोध घेतला; परंतु लाइफ-बोटस्चे मोडके तुकडे मिळण्यापलीकडे हाती काहीच लागले नाही ! जहाजावरील ६९ माणसांपैकी कोणी जिवंत असण्याची शक्यता नव्हतीच. किनारारक्षकपथकापैकी एका रक्षकाला लाइफबोटजवळ एक माणूस दिसला होता; परंतु त्याचा देह हाती लागला नाही ! त्यानंतर मात्र कोणालाही जहाजावरील माणसांपैकी एकाचेही दर्शन झाले नाही ! जिवंत माणूस तर सोडाच; परंतु मृतदेहही हाती लागला नाही. भारतीय जहाज महामंडळाच्या १३७ जहाजांपैकी एक जहाज कायमचे नाहीसे झाले !

या अपघाताची अथवा अपघातवेळी जहाजाची जी अवस्था होती त्याबाबत माहिती देणे महामंडळाचे कर्तव्य होते; परंतु चार–दोन शुष्क पत्रके काढण्याखेरीज महामंडळाने काही केले नाही. वास्तविक या दुर्दैवी अपघातामध्ये ज्यांचे प्राण गमावले त्यांचे आप्त–स्वकीय–आणि अन्य सर्वसाधारण जनता यांना विश्वासात घेऊन या अपघाताची जास्तीत जास्त माहिती देणे हे महामंडळाचे काम होते. नातेवाइकांकडून, पत्रकारांकडून विचारल्या गेलेल्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर दिले जाणे आवश्यक होते; परंतु महामंडळ स्वस्थ होते. 'जहाज अपघातवेळी अत्यंत सुस्थितीमध्ये होते' एवढा एकच घोषा महामंडळातर्फे चालू ठेवण्यात आला. चंद्रगुप्तवरील रडारयंत्रणा समाधानकारक नव्हती असे जहाज जपानमध्ये असताना लक्षात आले. पोर्टलॅण्ड येथे योग्य ती दुरुस्ती करण्यात आली असावी असे दिसते; परंतु त्या बाबतीत निश्चित आणि विश्वासार्ह माहिती आलेली नाही. अपघाताबाबत खऱ्या-खोट्या बातम्या पसरणार नाहीत याची वास्तविक पाहता पूर्ण दक्षता घेतली जाणे जरूर होते. हाती उपलब्ध असलेली सर्व माहिती सत्वर प्रसिद्धीला देणे आणि शक्य तेवढे शंका-निरसन करणे हे महामंडळाचे काम होते. अन्य कोणत्या देशातील

जहाजाला असा दुर्दैवी अपघात झाला असता तर परिपूर्ण तपशील देणारी आणि पुढील धोके टाळण्याच्या दृष्टीने काही सूचना करणारी विशेष वार्तापत्रे प्रसिद्ध झाली असती; पण एक 'करंट' साप्ताहिक आणि 'फॉर यू' हे पाक्षिक यांचा अपवाद सोडला तर या दुर्दैवी अपघाताची दखल केवळ वृत्तपत्रीय बातम्यांच्या स्वरूपातच घेतली गेलेली दिसते.

आवश्यक ती माहिती मिळत नसल्याने आणि महामंडळाचे अधिकारी कोणतीही माहिती देण्याबाबत उदासीन असल्यानेही असे घडले असेल !

अपघाताचे कारण शोधताना जहाजावरून आलेल्या संदेशाला आधारभूत मानले तर वादळी वारा आणि लाटा यांच्यापेक्षाही तंत्रज्ञांच्या आणि अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे जहाजाच्या विशिष्ट भागात पाणी घुसू लागले, असे दिसते. या संदेशाप्रमाणे No 1 hatch pantoon येथून पाणी प्रथम आत घुसले. या भागाची देखभाल करण्याचे प्रत्यक्ष कामचिप्पी – जहाजावरील सुतार करीत असतो. चिप्पीने केलेल्या कामाची पहाणी करण्याची जबाबदारी कॅडेटऑफिसरकडे असते, तर या बाबतची अंतिम जबाबदारी चीफ ऑफिसरची असते. सर्व काम व्यवस्थित केले असेल तर वादळी परिस्थितीतही सहसा Pantoon मधून पाणी आत येऊ शकणार नाही, याबाबत जहाजविषयक तज्ज्ञांमध्ये एकमत आहे. जहाजावरून आलेले संदेश आधारभूत मानले तर नैसर्गिक प्रकोपापेक्षाही मानवी निष्काळजीपणाकडेच अपघाताची मोठी जबाबदारी जाते.

या अपघाताबाबत जे खुलासे करण्यात आलेले आहेत त्यामुळे संबंधितांचे समाधान झालेले नाही. जहाजावरील विद्युत्उपकरणे केव्हा बदलण्यात आली ? त्यासंबंधीचा सारा तपशील कागदोपत्री उपलब्ध आहे काय ? जहाजावरील एक कॅडेट अजितकुमार याने आपल्या घरी लिहिलेल्या पत्रामध्ये जहाज चालविताना आकाशीच्या ग्रहस्थितीचा आधार घेतला जातो असे लिहिले आहे सर्व देशांमधील जहाजवाहतुकीमधून जहाजाची जागा ठरविण्यासाठी आकाशीच्या ग्रहस्थितीचा वापर केला जातो असा खुलासा महामंडळाने केला आहे; पण जहाजाची नेमकी जागा ठरविण्यासाठी नाही तर त्याची दिशा ठरविण्यासाठीही आकाशातील ताऱ्यांचे मार्गदर्शन घेतले जाते असे त्या कॅडेटने लिहिले आहे. याचा अर्थ या बाबतीत चंद्रगुप्तवरील यंत्रणा परिपूर्ण नव्हती असा घ्यायचा काय ?

अपघाताचे वेळी उपयोगी ठरेल अशी कोणती व्यवस्था चंद्रगुप्तवर होती ? ही व्यवस्था कितपत सुस्थितीमध्ये होती ? कठीण प्रसंगी प्रकाश बाबत तक्रार राहू नये म्हणून जहाजांवर विशेष संकटात वापरण्यासाठी प्रकाशयोजनेची व्यवस्था असते. चंद्रगुप्तवर अशी व्यवस्था होती काय ? कारण जहाजाचा शोध घेण्यासाठी गेलेल्या विमानांनी कमी प्रकाशाची तक्रार केलेली आहे. लाइफबोटस् कशा होत्या ? त्यांचे स्वरूप स्वयंचलित पद्धतीचे होते की नाही ? अशा किती तरी प्रश्नांची उत्तरे अद्यापि गुलदस्तात आहेत. गंमत अशी की, या प्रत्येक प्रश्नाला उत्तर आहे आणि ते महामंडळाजवळ आहे. मग ही सारी माहिती परिपूर्ण स्वरूपात महामंडळाने का प्रसिद्ध करू नये, हे समजू शकत नाही. समुद्राच्या तळाशी जाऊन बसलेल्या जहाजाच्या या कहाणीचे दुसरे टोक महामंडळाच्या हाती आहे; पण आवश्यक ती माहिती बाहेर येत नसल्याने उगाच वेड्यावाकड्या अफवा उठत रहातात. म्हणूनच जहाजमहामंडळाने पुष्कळ माहितीपत्रके काढण्याऐवजी परिपूर्ण अहवाल तयार करून त्याच्या प्रती निदान जहाजावरील दुर्दैवी कर्मचाऱ्यांच्या नातेवाइकांना तरी पाठवाव्यात. म्हणजे महामंडळाने केवळ नुकसानभरपाई दिली नाही तर सारा तपशीलही आपल्याला पुरविला अशी त्यांची खात्री होईल आणि शंकेला जागा राहाणार नाही.

जहाजमहामंडळासंबंधी थोडेसे लिहिणे अगत्याचे वाटते. जहाजमहामंडळ संपूर्ण शासकीय मालकीचे असून भारतीय जहाजव्यवसायामधील पहिल्या दहा कंपन्यांमध्ये अग्रस्थानी आहे. १९ जहाजांनी महामंडळाने आपल्या कार्याची मुहूर्तमेढ रोवली आणि गेल्या सोळा वर्षांत आपल्या कार्याचा व्याप झपाट्याने वाढवीत जहाजांची संख्या १३७ वर नेऊन ठेवली. त्यांपैकी चंद्रगुप्त गेले. आज महामंडळाजवळ १३६ जहाजे आहेत. सरकारी मालकीचे असूनही आता-आतापर्यंत भारतीय जहाजमहामंडळाची आर्थिक बाजू चांगलीच मजबूत होती. महामंडळाच्या नफ्यामध्ये गेल्या वर्षी एकदम आश्चर्य वाटावे इतकी घट झाली. ७५ साली महामंडळाला ३३·०१ कोटी रुपयांचा नफा झाला होता, तर ३१ मार्च ७६ रोजी संपलेल्या वर्षाचा ताळेबंद केवळ ९·७३ कोटी रुपयांचा नफा दर्शवितो. ३१ मार्च ७७ ची आकडेवारी नफा आणखीनच घटल्याचे सूचित करते. २३ नोव्हेंबर ७७ रोजी महामंडळाचा जो अहवाल प्रसिद्ध झाला आहे त्यामध्ये महामंडळाचे विद्यमान अध्यक्ष डॉक्टर रघुनाथ सिंग चक्क म्हणतात की, महामंडळाचा नफा केवळ घटत जाईल असेच नाही तर कदाचित येत्या काही वर्षांत तोटाही सहन करावा लागेल ! नफ्यात चालणारा एक मोठा सरकारी व्यवसाय इतक्या झपाट्याने मागे हटावा हे काही फारसे भूषणावह नाही. महामंडळ ज्या मंत्रालयाच्या नियंत्रणाखाली येते त्याचे राज्यमंत्री चंदराम यांनी महामंडळाच्या एकंदर कारभाराची चौकशी करण्यात यावी असे सुचविले असल्याचे समजते. *

## □ महागडे राज्यपालपद

भारतीय घटनेप्रमाणे राज्यांचा प्रमुख म्हणून काम करणारा राज्यपाल राज्याच्या एकंदर कारभारावर देखरेख ठेवतो. केंद्र सरकारशी गरजेप्रमाणे संपर्क साधतो. राज्य मंत्रिमंडळाने मागितल्यास सल्ला देतो आणि या सर्वांहून महत्त्वाचे म्हणजे किती तरी कार्यक्रमांची शोभा तो वाढवितो. गुलाबप्रदर्शनांचे उद्घाटन, सामन्यांचे, शर्यतीचे उद्घाटन, परिसंवादांचे अध्यक्षपद, आलेल्या पाहुण्यांचे आगतस्वागत, हीच खरे तर त्याची मुख्य कामे आणि ती पार पाडण्यासाठी सरकारी तिजोरीतून पाण्यासारखा पैसा खर्ची पडत असतो. पुन्हा जितकी राज्ये तितके राज्यपाल. त्यामुळे हरियाना आणि पंजाबची राजधानी असलेल्या चंदीगढमध्ये तर दोन राज्यपाल. पंजाबच्या राज्यपालासाठी चार एकर जमिनीवर पसरलेले १४ खोल्यांचे प्रशस्त राजभवन आहे, तर त्याच चंदीगढमध्ये हरि-

पृष्ठ १९ वर

# निवडणूकचित्र

## मतदानाच्या दृष्टिकोनातून

वा. दा. रानडे

निवडणुकांच्या निकालासंबंधी बरेच लिहिले गेले आहे. त्यातल्या मुद्द्यांची पुनरुक्ति न करता जे मुद्दे दुर्लक्षिले गेले आहेत असे मला वाटते त्यासंबंधीच येथे लिहीत आहे. मतदारांचा खरा कौल अजमावयाचा तर कोणत्या पक्षाला किती जागा मिळाल्या यापेक्षा मते किती मिळाली यालाच महत्त्व द्यायला हवे; पण आपल्याकडील निवडणूक-निकालांच्या चिकित्सेत मतदानाला योग्य ते महत्त्व दिले गेलेले आढळत नाही. पक्षवार मतदानाचे आकडे उपलब्ध व्हावयास वेळ लागतो; पण तोपर्यंत न थांबता आपल्या राजकीय निरीक्षकांपैकी बहुतेक जण जागांच्या आकडयांवरून निष्कर्ष काढून मोकळे होतात.

सर्वच राज्यांतील पक्षवार मतदानाचे आकडे अजून उपलब्ध झालेले नाहीत; पण जे उपलब्ध झाले त्यांवरून दिसणारे चित्र केवळ जागांच्या आकडयांवरून दिसणाऱ्या चित्रांपेक्षा निराळे आहे. कर्नाटक व आंध्रमध्ये इंदिरा काँग्रेसने बहुसंख्य जागा जिंकल्या; पण दोन्ही राज्यांत त्या पक्षाला मते ४५ टक्क्यांपेक्षा कमीच मिळालेली आहेत. कर्नाटकमध्ये इंदिरा काँग्रेसने ४४·३१ टक्के मते मिळविली. १९७२ मध्ये काँग्रेसला ५३·५६ टक्के मते मिळाली होती. १९७७ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस-मतांचे प्रमाण ५६·७४ टक्के होते म्हणजे या वेळच्या निवडणुकीत इंदिरा काँग्रेसला मिळालेली मते १९७७ च्या लोकसभा निवडणुकीतील काँग्रेसमतदानापेक्षा १२·४३ टक्क्यांनी कमी आहेत. काँग्रेसमध्ये फूट पडल्याने मते विभागली गेली हे खरे. रेड्डी काँग्रेसने कर्नाटकात ८·१० टक्के मते मिळविली. दोन्ही काँग्रेसची मते एकत्र केली तरी ती लोकसभा निवडणुकीतील काँग्रेस मतांपेक्षा ४ टक्क्यांनी कमीच आहेत आणि १९७२ च्या तुलनेने त्यात ९ टक्के घट झालेली आहे. इंदिरा काँग्रेसला सत्ता मिळविण्यात यश आले असले तरी मतदारांचा पाठिंबा कमी झालेला आहे.

आंध्र प्रदेशातही हेच दृश्य दिसते. तेथे इंदिरा काँग्रेसला ४३ टक्के मते मिळाली. गेल्या वर्षीच्या लोकसभा निवडणुकीतील मतदानापेक्षा ती १४ टक्क्यांनी कमी आहेत आणि १९७२ शी तुलना केली तर ९ टक्क्यांनी कमी आहेत.

कर्नाटक व आंध्र या दोन्ही राज्यांत अवघी ४३ ते ४४ टक्के मते मिळवून इंदिरा काँग्रेसने सत्ता मिळविली. १९७१ च्या लोकसभा निवडणुकीतील इंदिरा लाटेच्या काळातही सबंध भारतात काँग्रेसला ४३ टक्केच मते मिळालेली होती. बहुसंख्य मतदारांनी इंदिरा लाटेतसुद्धा काँग्रेसच्या बाजूने मते दिलेली नव्हती, हीच परिस्थिती या वेळीही होती. फरक पडला तो एवढाच की, काँग्रेसचे बहुसंख्य अनुयायी इंदिरा गोटात गेले. रेड्डींचा तंबू ओस पडला!

जनता पक्षाला दक्षिणेत पाय रोवता आला नाही हे म्हणणेही पूर्णार्थाने खरे नाही. ज्या घटक पक्षांचा मिळून जनता पक्ष बनला त्या पक्षांचा दक्षिणेत कधीच जोर नव्हता. असे असता या वेळच्या निवडणुकीत जनता पक्षाने कर्नाटकात ३७·८ टक्के व आंध्रमध्ये २९ टक्के मते मिळवावी ही प्रगतीच म्हणायला हवी; पण दोन्ही राज्यांत १९७७ च्या लोकसभा निवडणुकीपेक्षा जनता पक्षाच्या मतात घट झालेली आहे. कर्नाटकात ती २ टक्के व आंध्रप्रदेशात ती ३ टक्के आहे. काँग्रेसच्या मतात झालेल्या घटीच्या तुलनेने ही घट थोडी असली तरी एक वर्षात आपल्याला असलेला मतदारांचा पाठिंबा वाढण्याऐवजी कमी का व्हावा, आपले काय चुकले, बळ कोठे अपुरे पडले याचा जनतानेत्यांनी अंतर्मुख होऊन विचार करायला हवा.

मतदानाच्या दृष्टिकोनातून विचार करता महाराष्ट्रात काय चित्र दिसते?' सर्वात जास्त जागा मिळविणाऱ्या जनता पक्षाला फक्त २७ टक्के मते मिळाली. गेल्या वर्षीच्या लोकसभानिवडणुकीत ३२·४१ टक्के मते पडली होती. म्हणजे जनता पक्षाच्या मतांमध्ये पाच टक्के घट झाली. शे. का. पक्षाबरोबरचा मोडलेला समझोता, काही उमेदवारांची बंडखोरी आणि केन्द्रातील एक वर्षातील जनता कारभाराबद्दल असलेले असमाधान यामुळे ही घट झालेली आहे. शेतकरी कामगार पक्षाला ५ टक्के मते मिळाली. १९७२ च्या निवडणुकीत या पक्षाने ५·६६ टक्के मते मिळविली होती. शे. का. पक्षाचे बळ वाढले तर नाहीच पण फारसे घटलेलेही नाही असे या मतदानाच्या आकडयांवरून दिसून येते. शे. का. पक्षाला लोकसभा निवडणुकीत मात्र ६·०९ टक्के मते मिळाली होती.

दोन्ही काँग्रेस पक्षांपैकी महाराष्ट्रात रेड्डी काँग्रेसला २४·५ टक्के व इंदिरा काँग्रेसला १८ टक्के मते मिळाली. गेल्या वर्षीच्या लोकसभानिवडणुकीत काँग्रेसला ४७·०२ टक्के मते मिळाली होती. दोन्ही काँग्रेस पक्षांची मते एकत्र केली तरी ती लोकसभा निवडणुकीतील मतदानापेक्षा पाच टक्क्यांनी कमीच आहेत. १९७२ च्या इंदिरा लाटेतील निवडणुकीत काँग्रेसने महाराष्ट्रात ५६·३२ टक्के मते मिळविली होती. त्या तुलनेने दोन्ही काँग्रेसची एकत्रित मतेसुद्धा १४ टक्क्यांनी कमीच आहेत. रेड्डी काँग्रेसला मिळालेली २४ टक्के मते जनता पक्षाला मिळालेल्या मतांपेक्षा फक्त तीन टक्क्यांनी कमी आहेत. याचा अर्थ जनता पक्षाने रेड्डी काँग्रेसपेक्षा ३० जागा अधिक मिळविल्या असल्या तरी त्याला मते फक्त तीन टक्केच जास्त मिळालेली आहेत.

महाराष्ट्रातील या वेळच्या निवडणुकांचा आणखी एक विशेष म्हणजे मतदान ६५ टक्के म्हणजे लोकसभा निवडणुकीतील मतदानापेक्षा ५ टक्क्यांनी वाढले. राज्याच्या गेल्या सहा निवडणुकांतील मतदानाचा हा उच्चांक असला तरी कर्नाटक व आंध्रच्या तुलनेने महाराष्ट्राचे मतदान कमीच आहे. एकदोन मतदारसंघ वगळता महाराष्ट्रात सर्वत्र पन्नास टक्क्यांपेक्षा अधिक मतदान झालेले असले तरी विजयी उमेदवारांना पडलेली मते पाहिली तर बहुसंख्य उमेदवार ५० टक्क्यांपेक्षा कमी मतांनी विजयी झालेले दिसतात. उदाहरणादाखल काही जिल्ह्यांचा येथे उल्लेख करीत आहे. सोलापूर जिल्ह्याच्या १३ जागांपैकी ९ जागांचे उमेदवार ५० टक्क्यांपेक्षा कमी मतांनी निवडून आले आहेत. त्यात ३ काँग्रेसचे, २ इंदिरा काँग्रेसचे, १ जनता, १ मार्क्सवादी, १ रिपब्लिकन गवई, गट व १ अपक्ष आहे. नगर जिल्ह्याच्या १३ जागांपैकी १० जागांचे विजयी उमेदवार असेच ५० टक्क्यांपेक्षा कमी मतांनी विजयी झाले आहेत. काँग्रेस ६, जनता १, रिपब्लिकन गवई गट १, कम्युनिस्ट १, अपक्ष १ अशी त्यांची वर्गवारी आहे. कुमार सप्तर्षी नगर दक्षिण भागातून निवडून आले, पण त्यांची मते ५० टक्क्यांपेक्षा कमी आहेत. पुणे शहरातल्या सहा जागांपैकी भाई वैद्य व सुभाष सर्वगोड या विजयी जनता उमेदवारांना पडलेली मते ५० टक्क्यांपेक्षा कमी आहेत. जिल्ह्यातील बाकीच्या जागांपैकी मंत्री शं. बा. पाटील इंदापूरमधून ५० टक्क्यांपेक्षा कमी मतांनीच निवडून आले. जुन्नर, आंबेगाव, खेड या जागाही काँग्रेसने ५० टक्क्यांपेक्षा कमी मतांनी जिंकल्या. पुणे जिल्ह्यात १८ पैकी ११ उमेदवार अशा पद्धतीने निवडून आले आहेत.

सरकार सत्तेवर राहण्यासाठी ५० टक्क्यांपेक्षा अधिक आमदारांचा पाठिंबा हवा, तर हेच तत्त्व विजयी उमेदवाराच्या बाबतीत का लावू नये? ५० टक्क्यांपेक्षा अधिक मतांची अट तेथेही लावण्याचा आग्रह लोकशाहीवाद्यांनी धरायला हवा. □

# माचणूर आश्रम

## स्वावलंबनाकडे वाटचाल

जगदीश गोडबोले

माचणूर चंद्रभागेच्या तीरावरचे एक रम्य क्षेत्र. नदीच्या पात्रात जटा सोडून विहरणारे सुंदर शिवालय व इतिहासाचो भग्न कहाणी सांगणाऱ्या गढीच्या मध्ये वसलेले. भक्ताच्या भेटीलागी युगे अठ्ठावीस विटेवरी उभ्या असलेल्या पंढरीच्या विठुरायापासून व भक्तांच्या हाकेला प्रत्यक्ष धावून जाणाऱ्या मंगळवेढ्याच्या दामाजीपंतापासून प्रदिक्षणेच्या अंतरावर उभे ठाकलेले अशा या पावनस्थळी स्व. बाबामहाराज आर्वीकर यांनी 'मोक्षधाम' आश्रमाची स्थापना केली. नमस्कार–चमत्कारापेक्षा तत्त्व–चिंतनाकडे महाराजांची प्रवृत्ती. त्यामुळे सहाजिकच आश्रमाद्वारे साधकांच्या साधनेबरोबरच आजुबाजूच्या गावांचाही विकास व्हावा ही प्रेरणा. आश्रमातर्फे दरवर्षी दत्त-जयंतीच्या सुमारास 'साधना–महोत्सव' साजरा होत असतो. भजन-पूजन-नाम-संकीर्तनात व भक्ति-रसात सगळे न्हाऊन निघतात; पण अनेक धर्मक्षेत्रांतील कार्याप्रमाणे गडबड-गोंधळ न होता सर्व कार्यक्रम अतिशय आखीव-रेखीव होण्याकडे स्व. आर्वीकरांचा कटाक्ष असे. त्यांच्या महानिर्वाणानंतरही ही परंपरा सुरू राहिली.

डिसेंबर १९७६ च्या 'साधना-महोत्सवा'च्या स्वरूपात जरा फरक पडला. महोत्सवाचे संयोजक डॉ. रंगनाथ गोडबोले व त्यांच्या सहकाऱ्यांनी उत्सवाला जास्त समाजोन्मुख बनविण्याचा प्रयोग केला. स्व. बाबांना मूळ अभिप्रेत असलेल्या प्रपंच व परमार्थ, व्यष्टी व समष्टी यांची सांगड घालण्याचा हा प्रयत्न होता. उत्सवात नेहमीच्या ध्यान धारणेबरोबरच ज्ञान-विज्ञान, त्याचे प्रत्यक्ष उप-योजन, सामाजिक प्रश्न इत्यादी विषयांवर डॉ. बी. डी. टिळक, सर्वश्री गं. वा. सरदार, रंगा वैद्य, श्री. ग. माजगावकर, बिंदुमाधव जोशी, प्रा. एस्. डी. कुलकर्णी, प्रा. दाभोळकर, प्रा. सौ. पोरे यांसारख्या जाणकारांचे, विचारवंत कार्यकर्त्यांचे परिसंवाद-चर्चा संयोजकांनी घडवून आणल्या. शेतीप्रदर्शनही आयोजित केले होते.

श्री. बाबा आमटे यांच्या भमरागड प्रकल्पावर मी काम करीत असल्यामळे 'भमरागड ते माचणूर' या विषयावर माहिती सांगण्याचे काम माझ्याकडे आले. इतर माहितीबरोबरच 'आमच्या इथे शिबिरे होतात. तेव्हा किती धान्य 'जमवायचे' नाही, तर किती धान्य 'पिकवायचे' हे आव्हान आम्ही स्वीकारतो असे न रहावून मी सांगून टाकले.

खरं म्हणजे लहान तोंडी मोठा घास घेतला होता. कारण मला अंगा-खांद्यावर खेळवलेली अनेक लहानथोर माणसे, गावकरी समोर हजर होते; पण अनेक दिवस मनात दडून राहिलेले शल्य आणखी दबून राहणे शक्य नव्हते. आश्रमाकडे आठ–दहा एकर जमीन होती. शेजारून दुथडी भरून वाहणारी भीमा होती. वीज होती. इले. पंपसेटस् होते, कष्टाचे पहाड उपसणारे सेवाभावी भक्त होते; पण हे सर्व असूनही आश्रमाला स्वावलंबी करण्याचे प्रयत्न सातत्याने होत नव्हते. आश्रमाच्या नित्य व्यवहारासाठी व उत्सवासाठी फक्त धान्य–पैसा 'जमविण्याचीच' भाषा नेहमी ऐकू येत होती. प्रभु रामचंद्राचा पदस्पर्श होऊनही अहल्या शिळाच होऊन पडली होती! लहानपणी हे समजले नाही, जरा मोठेपणी समजले; पण बोचले नाही, पण अक्षरशः भग्न शरिराच्या राखेतून आणि दग्ध भूमीच्या फुफाट्यातून नंदनवन साकार करणारे बाबा आमटे यांचे प्रयत्न जवळून पाहिल्यावर ही जाणीव फारच अस्वस्थ करू लागली. प्रपंच आणि परमार्थ, प्रवृत्ती आणि निवृत्ती यांची अशी फारकत का? समाजविमुख होऊन हिमालयाच्या गुंफेत नाही तर मंदिराच्या गाभाऱ्यात वैयक्तिक शोधासाठी घुसमटणारा कसला आला आहे धर्म! रोम पेटले असता फिडल वाजविणारा निरो आणि अवघा समाज नाना व्याधींनी ग्रासलेला असताना निवृत्तिमार्गाचे तुणतुणे ओढत बसलेले आपले काही साधुसंत यात फरक तो कोणता? असे अनेक खंडी–पाखंडी विचार मनात थैमान घालीत होते. दोष कदाचित् जवानीचा, अज्ञानाचा असेल, पण गोष्ट साफ कोणीही नाकारू शकत नव्हते. गाडगेमहाराज, तुकडोजींसारखे वंदनीय अपवाद सोडले, तर खराखुरा मानवताधर्म जागविण्याचे यज्ञकुंड कोणी पेटवीत नव्हते.

असो. पण हे असले सर्व विचार, चर्चा, परिसंवाद केवळ आत्मिक समाधानासाठी असतात, शोभारूप असतात. त्यातील सर्व चिंतन–मनन नंतर विसरायचे असते अशी माझी भोळीभाबडी समजूत होती; पण परवा वर्षा-सव्वा वर्षानंतर माचणूरच्या परिसरात गेल्यानंतर या सर्व समजुतींना सुखद तडा गेला. आश्रमाभोवतालच्या वैराण माळरानामध्ये भरदार ऊस डोलतो आहे, वरलक्ष्मी कपाशीची मुक्त हस्ताने उधळण होत आहे; ज्वारीच्या कणसांमध्ये दाणे मावत नाहीत! 'ठेविले अनंते तैसेचि रहावे' म्हणणारा जगनाबा निसर्गाला 'आडव घालून' आणखी पडीक 'जिमीन' वहिताखाली आणायची भाषा बोलत आहे. जन्मभर शेतीचा गंध नसलेले आणि कांट–हेगेल–ज्ञानेश्वर–कबीर यांच्या घटा–पटात घालविलेले डॉ. रंगनाथ गोडबोले दिवस–रात्र शेतात रमले आहेत. द्वैत–अद्वैताएवढीच युरिया–सुफलाची चर्चा सफाईने करीत आहेत. आश्रमाचे जातिवंत साधक साथीला घेऊन निव्वळ आठ-दहा हजारांचा नफा घेण्याची हिंमत धरत आहेत. खरोखर नजर लागण्यासारखा बदल आहे!

अर्थात् आश्रमाला स्वावलंबी करणे, स्वतःचा निधी उभारणे ही केवळ पहिली पायरी आहे. माध्यम आहे. त्यातून शाळा–दवाखाना, कृषि–विस्तार–केन्द्र, समता–केन्द्र इत्यादी समाज–विकास व परिवर्तनाचे मंदीर कसे उभे रहाते हे महत्त्वाचे आहे. इथेही वैराण माळरानाचे आव्हान आहे. खेड्यांना ग्रासणाऱ्या जात–पात–गाव–पक्ष यांचे भयानक रान इथे माजलेले आहे; पण आश्रमाच्या साधकांबरोबर नंदकुमार पवारसारखे आजुबाजूचे जवान-मित्र धर्मकार्यात उतरत आहेत.

१९७६ च्या उत्सवाबद्दल लिहिताना 'माणूस'कारांनी म्हटले होते 'प्रपंच व परमार्थ ही दोन्ही टोके एकदम पकडण्यासाठी चालकांनी चालविलेली ही धडपड स्पृहणीय, पण मधूनच वाटे, की हे शक्य आहे का?'

माचणूरच्या प्रयोगाला येत असलेली गोमटी फळे पाहून वाटतं-शक्यतेचा इसार मिळाला आहे. आशेचा अंकुर धुमारला आहे. या अंकुराचा डेरेदार वृक्ष होवो व 'दुरितांचे तिमिर जाऊन' 'जो जे वांछील, तो ते लाभो' हीच पांडुरंगाच्या चरणी या पाखंड्याची प्रार्थना! □

परराष्ट्रीय घडामोडी

# चीन : म्हाताऱ्यांचा राजकारणावरील प्रभाव कायम आहे

चंद्रशेखर पुरंदरे

५ मार्चला चीनच्या नॅशनल पीपल्स कॉंग्रेसचे पेकिंगमध्ये भरलेले राष्ट्रीय अधिवेशन संपले. २६ फेब्रुवारीला रविवारी हे अधिवेशन सुरू झाले होते. त्यासाठी चीनच्या कानाकोपऱ्यातून प्रतिनिधी आलेले होते. एकूण ३४५६ प्रतिनिधी 'द ग्रेट हॉल ऑफ द पीपल्स'मध्ये जमले होते. या सर्व प्रतिनिधींची प्रांतिक पातळीवर निवड गेल्या काही महिन्यांतच झालेली होती. यांना प्रतिनिधी म्हणायचे; पण आपल्याकडच्या खासदाराप्रमाणे यांच्या हातात कोणतीही निर्णायक शक्ती नसते. चीनचे जे रबरस्टॅंप पार्लमेंट आहे, त्याचे हे सभासद. तीन वर्षे मुदत असणाऱ्या या पार्लमेंटचे प्रथमच उद्घाटन झाले. या उद्घाटनाच्या वेळी हुआ कुओ फेंग या कम्युनिस्ट पक्षाच्या अध्यक्षाने इसवी सन २००० पर्यंत चीनला जागतिक शक्ती बनविण्याचे आवाहन केले.

अशा प्रसंगी करण्यात येणाऱ्या नैमित्तिक आवाहनाखेरीज तैवानची मुक्ती करण्यासाठी सैन्याला सज्ज होण्याचा इशारा देण्यात आला. हा इशारा सहजरीत्या दुर्लक्ष करण्यासारखा नाही.

या कॉंग्रेसचे महात्म्य असे की, चीनचे राजकीय चित्र या कॉंग्रेसनंतर पालटेल असा अंदाज होता. अगदी अपेक्षित गोष्ट म्हणजे चीनचा पोलादी पुरुष तेंग सिआओ पेंग हा उपपंतप्रधानपदावर चढेल आणि हुआ कुओ फेंग याची उचलबांगडीच होईल ही होती; पण तसे झालेले दिसत नाही. किंबहुना आपल्याकडच्या मंत्रिमंडळासारखी असणारी स्टेट कौन्सिलही फारशी फेरबदल न होता तशीच राहिलेली आहे. अगदी ताजी महत्त्वाच्या जागांची वाटणी अशी आहे : हुआ कुओ फेंग कम्युनिस्ट पक्षाचा चेअरमन आणि पंतप्रधान. तेंगसिआओ पेंग हा ज्येष्ठ उपपंतप्रधान आणि कम्युनिस्ट पक्षाचा व्हाइस चेअरमन. प्रमुख बदल असा एकच झालेला आहे. तो म्हणजे संरक्षणमंत्री मार्शल येह शिएन यिंगच्या ऐवजी मार्शल सू सिआंग शिएनची त्या पदावर नेमणूक झालेली आहे. मार्शल येह शिएन यिंग हा ८० वर्षांचा वृद्धयुवा फार पूर्वीपासून माओचा साथीदार आहे. तो आता नॅशनल पीपल्स कॉंग्रेसच्या स्टॅंडिंग कमिटीचा अध्यक्ष असेल किंवा दुसऱ्या शब्दात मर्यादित स्वरूपात तो चीनचा सर्वोच्च नेता असेल. त्याची जागा घेणारा मार्शल सू सिआंग शिएन हा ७६ वर्षांचा आहे. 'लॉंग मार्च'पासून तो चीनच्या उच्च वर्तुळात समाविष्ट आहे.

राजकीयदृष्टचा महत्त्वाची गोष्ट म्हणजे तेंग सिआओ हा संरक्षणमंत्री तेंग सिआओ पेंग याला जवळचा समजला जातो. तेंग सिआओ पेंग सध्या तरी प्रसिद्धीच्या प्रखर झोतात दिसत नाही. सगळी प्रसिद्धी पंतप्रधान हुआ कुओ फेंग आणि मार्शल येह यांच्यावर केन्द्रित झालेली दिसते; पण खरा ताकदीचा माणूस तेंग सिआओ पेंग आहे. १९७६ मध्ये चौ एन लायचा मृत्यू झाला. तोपर्यंत तो चौ एन लायचा वारसदार समजला जात असे; परंतु नंतर माओची बायको चिअँग चिंग आणि तिचे शांघायचे चार दोस्त गँग ऑफ फोर यांनी सुरू केलेल्या मोहिमेला तो बळी पडला. हा त्याचा दुसरा राजकीय अस्त होता; पण परत चांडाळ-चौकडीच्या नायनाटानंतर तो प्रकाशात आला. आज त्याच्याच ध्येयधोरणांना मान्यता मिळालेली आहे; पण प्रत्यक्ष त्याच्या नावाचा तेवढा उदोउदो दिसत नाही. आताच संपलेल्या या अधिवेशनात त्याने एकही महत्त्वाचे भाषण केले नाही ही गोष्टही त्याला दुसऱ्या क्रमांकावरच डांबून ठेवण्याच्या प्रयत्नाची निदर्शक आहे; पण त्या माणसाची ताकद सगळे ओळखून आहेत. सध्या तरी तो या क्रमांकावर नाराज दिसत नाही. मिलिटरीवर त्याचा प्रचंड प्रभाव आहे. तो मिलिटरी चीफ ऑफ स्टाफही आहेच. मिलिटरीचे चीनच्या राजकारणात व सत्ताकारणात अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. त्यामुळेच या अधिवेशनातही तेंग सिआओ पेंग मिलिटरीचा प्रतिनिधी म्हणून वावरला ही उल्लेखनीय बाब आहे. म्हणजे उद्या जर त्याला सत्ता काबीज करायची असली, तर तो याच माध्यमाचा वापर करणार हे उघड आहे. त्या दृष्टीनेही त्याने त्याचा माणूस संरक्षणमंत्री म्हणून पेरलेला असावा.

या अधिवेशनात स्पष्ट झालेली दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे म्हाताऱ्यांचाच प्रभाव कायम आहे. हुआ कुओ फेंग हा सत्तावन्न वर्षांचा तरुण वगळता बाकी सगळे ७० ते ८० मधले आहेत. यातून दोन गोष्टी उघड होतात. पहिली म्हणजे पुढच्या पिढीच्या हातात सूत्रे द्यायला म्हातारे उत्सुक नाहीत आणि दुसरी म्हणजे गटागटाने वारसदार जर निवडले असतील तर त्यात एकमत झालेले नाही. १९६७ च्या सांस्कृतिक क्रांतीमध्ये बहुतेक सर्व बुजुर्ग बदनाम करण्यात आले होते, त्यांना परत एकदा थडग्यातून उठविण्यात आलेले आहे. ली वाई हान हा पूर्वीचा कम्युनिस्ट पार्टीच्या युनायटेड फ्रंटचा नेता, मे यो हा पेकिंग रेडिओवरचा १९६७ सालापर्यंतचा उच्चाधिकारी, लिउ सिआओ हा १९५५ सालापासूनचा रशियातला राजदूत आणि १९६३ सालातला उपपंतप्रधान. शिवाय काओ यांग वेन, लिऊ शि आंग, सिंग फू इत्यादी लॉंग मार्चचे प्रणेते दहा-बारा वर्षांनी परत एकदा लोकांसमोर आलेले आहेत.

या अधिवेशनाचा मूळ उद्देश चीनच्या इतिहासात नवीन पान उघडणे हा होता. दुसऱ्या महायुद्धानंतर जपानने ज्या वेगाने प्रगती केली त्या वेगाने प्रगती करणे हे पुढच्या दहा वर्षांचे उद्दिष्ट आहे. संपूर्ण चीनचे आधुनिकीकरण करण्याचे ठरविण्यात आले आहे. म्हणूनच नवी स्टेट कौन्सिल जो

जाहीर झाली आहे, तिच्यात टेक्स्टाइल्स, केमिकल्स, फर्टिलायझर्स वगैरे नवीन खाती उघडण्यात आली आहेत. एकूण अंदाजे ३७ कॅबिनेट मंत्र्यांसारखे कौन्सिलर्स असावेत. गेले काही महिने वेळोवेळी त्यांची नावे जाहीर होत होती व या अधिवेशनानंतर एकदम तेरा जणांची त्यात भर पडली. या महत्त्वाकांक्षी दशवार्षिक योजनेला सुलभता म्हणून चीनच्या घटनेतही महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले आहेत. हे बदल अजून बाहेरच्या जगाला ज्ञात करून देण्यात आलेले नाहीत.

या योजनेची अंमलबजावणी सुकर व्हावी म्हणून लष्कराचीही पुनर्रचना झाली आहे. लष्कराच्या सक्तीच्या सेवेच्या मुदतीत वाढ करण्यात आली आहे. भूदलाला तीन वर्षे, वायुदलाला चार वर्षे व नौदलाला पाच वर्षे अशी ही अंदाजे वाढ आहे. यामुळे अर्थातच उत्पादनात प्रचंड वाढ अपेक्षित आहे. एकूण सगळी दशवार्षिक योजना कशी अंमलात येईल याचे बारीकसारीक मुद्दे अजून स्पष्ट करण्यात आलेले नाहीत. तरीसुद्धा यंत्रसामग्रीच्या आयातीवर भर दिला जाईल असा नूर दिसतो.

दरम्यान चिअँगचिंगच्या (माओच्या विधवेच्या) गँग ऑफ फोरच्या नावे खडे फोडण्यात येत आहेतच. १९६७ साली सांस्कृतिक क्रांतीच्या धामधूमीत हाँगकाँगचे वातावरण तंग झाले होते. हिंसाचारावर उपाय म्हणून ब्रिटिश सरकारने तीन कम्युनिस्ट दैनिकांवर बंदी घातली होती आणि अनेकांना स्थानबद्ध केले होते. त्याला प्रत्युत्तर म्हणून २२ ऑगस्ट १९६७ ला ब्रिटिश मिशनची इमारत जाळण्यात आली आणि त्यातील लोकांना वाईटरीत्या वागविण्यात आले. हा सर्व प्रकार चिअँगचिंग आणि लिन पिआओने केला असा दावा परवाच करण्यात आला. लिन पिआओ हा तर एके काळी माओचाच वारसदार समजला जाई. त्याला मंगोलियावरून पळून जात असताना मध्यंतरी ठार मारण्यात आले होते.

दुसरी एक मोहीम या जोडीला सुरू करण्यात आली आहे, ती म्हणजे सरकारी अधिकाऱ्यांचे भ्रष्टाचार उघडकीला आणण्याची. १४ फेब्रुवारीपासून रोज पीपल्स डेलीमध्ये यावर एक तरी लेख असतोच. शिवाय त्यात या भ्रष्ट अधिकाऱ्यांना दिलेली शिक्षा व छळ झालेल्यांना मिळालेला न्याय यांचेही वर्णन असते. अधिवेशनातही गँग ऑफ फोर विरुद्धचा लढा अधिक जोरकस करण्याचे आवाहन करण्यात आले.

या निमित्ताने चीनचे राष्ट्रगीतही नवीन करण्यात आले. माओचा वारंवार उल्लेख करून, त्याचे स्मरण करून 'पुढे चला!' असे आवाहन करणारे हे राष्ट्रगीत स्क्वेअर ऑफ हेवनली पीसमध्ये हजारो नागरिकांच्या उपस्थितीत वाजविण्यात आले.

एकूण हा सोहळा भविष्याची नवीन स्वप्ने दाखवीत उरकण्यात आला.

### तिबेटमधील अन्तर्गत तणाव

चीनने तिबेटवर आक्रमण करून अख्खा तिबेट घशात घातल्याला बरीच वर्षे लोटली. त्या वेळी निर्वासित झालेले बरेचसे तिबेटी आपापल्या ऐपतीप्रमाणे अमेरिका, स्वित्झर्लंड, भारत इत्यादी देशांत स्थायिक झाले; परंतु अजूनही निर्वासित दलाई लामाच्या नेतृत्वाखाली मायभूमीशी संधान शाबूत ठेवण्याचे प्रयत्न चालू आहेत. बाहेरून निषेध नोंदविण्याचे आणि युनोत हा प्रश्न उपस्थित करण्याचे बरेच प्रयत्न करण्यात आले; पण आता या लोकांना आशादायक अशा बातम्या खुद्द तिबेटमधून येऊ लागलेल्या आहेत. विशेषत: अलीकडच्या काही महिन्यांत प्रत्यक्ष तिबेटमधील तरुण पिढी प्रस्थापित चिनी राजवटीविरुद्ध आवाज उठवीत असल्याच्या या बातम्या आहेत. मोठ्या प्रमाणात धरपकडीचे सत्र चालू आहे, सामुदायिक हत्या आणि हद्दपारी चीनचे केन्द्रीय सरकार या असंतुष्टांवर लादीत आहे.

सगळ्यात अलीकडची घटना म्हणजे १९७७ च्या डिसेंबरमध्ये दोनशे तरुण तिबेटी चळवळ्यांना फाशी देण्यात आले. ल्हासा आणि शिगास्ते या गावांतील भूमिगत चळवळीचा जेव्हा चीनच्या सरकारला वास लागला, तेव्हा ही कारवाई करण्यात आली. दहशत निर्माण करण्यासाठी आणखी सहाशे जणांना मिलिटरी ट्रक्समध्ये कोंडून अज्ञात स्थळी नेण्यात आले. या सहाशे जणांचा गुन्हा म्हणजे ते चीनविरोधी गाणी गात होते!

१९५०-७० च्या दरम्यान तिबेटमधली बरीच लहान मुले शिक्षण देण्यासाठी व कम्युनिस्ट तत्त्वज्ञान बिंबविण्यासाठी मूळ चीनमध्ये नेण्यात आली होती. ती जेव्हा उच्चशिक्षित होऊन परत आली तेव्हा त्यांना वस्तुस्थिती व सरकार निर्माण करीत असलेला डोलारा यातला फरक कळला. आपले शोषक कोण व मुद्दाम आपल्याला गुलामीत ठेवणारे कोण याची कल्पना आल्यावर त्यांनी राज्य हलवायला सुरुवात केली आहे.

अजूनही तुरळक येणारे निर्वासित आणि नेपाळी व्यापारी यांच्या मतानुसार चिनी सरकार प्रचंड प्रमाणात विरोध दडपू पहात आहे.

### ब्रह्मदेशातील-अन्तर्गत यादवी

चीनने ब्रह्मदेशात आपले हातपाय पसरायला सुरुवात केलेली आहे. सुमारे महिन्यापूर्वीच तेंग सिआओ पेंग या चीनच्या उपपंतप्रधानाने ब्रह्मदेशाला भेट दिली होती आणि आता थोड्याच कालावधीत काही तरी भडका उडणार असा रंग दिसतो.

ब्रह्मदेशची कम्युनिस्ट पार्टी आणि चीनची कम्युनिस्ट पार्टी यांचे बरेच गुफ्तगू आहे. चीनच्या कम्युनिस्ट पाठिंब्याच्या जोरावर इरावती नदीच्या खोऱ्यात लवकरच नागरीयुद्ध सुरू होईल असा अंदाज आहे. इरावतीच्या खोऱ्यात ब्रह्मदेशाच्या ३ कोटी लोकसंख्येच्या सुमारे ७५% लोक रहातात. इथे काहीही ठिणगी पडली की, सगळे राष्ट्रजीवन उद्ध्वस्त होणार हे नक्की आहे. ईशान्य ब्रह्मदेशातील कुनलाँग आणि सेठनी ही दोन प्रमुख आणि मोक्याची गावे आहेत. त्यांचा ताबा मिळविणे हे गनिमांचे प्रमुख उद्दिष्ट राहील. सुमारे दहा ते चौदा हजार इतकी त्यांची संख्या आहे. साल्वेनच्या पश्चिमेमध्ये अशा रीतीने जर या ब्रह्मी कम्युनिस्टांना पाय रोवता आला, तर त्यांना निश्चितच इरावती जिल्ह्यात सरकता येईल.

ब्रह्मदेशचा अध्यक्ष जनरल ने विन हा सदसष्ट वर्षांचा हृदयविकाराने आजारी मनुष्य आहे. तो फारसा तग धरील की नाही शंकाच आहे. त्याचे राजकीय वजन इतके घटले आहे की, तो परिस्थिती पाहूनसुद्धा काहीही नियंत्रण ठेवू शकत नाही.

महिन्याभरापूर्वी तेंग सिआओ पेंग रंगूनला आला असता ने विनने त्याला ब्रह्मी कम्युनिस्ट पक्षाला चिनी कम्यु. पक्षाची होत असलेली मदत बंद करण्याची विनंती केली होती; परंतु त्याला ही मदत करणे वा न करणे ही दोन कम्युनिस्ट पक्षातील अन्तर्गत बाब आहे असे मासलेवाईक उत्तर देण्यात आले होते. यावरून ने विनची काय किंमत आहे हे लक्षात येईल. अर्थात मदतीचा ओघ चालू राहिला आणि चालू आहे. तेव्हा आता ब्रह्मदेशाचा बांगला देश केव्हा होतो ते पहायचे. ☐

एका सत्यघटनेवर आधारित लघुकथा

# भूक जेव्हा भडकून उठते....

द्वा. पां. लेले

खोपोलीचा शीळफाटा त्या दिवशी उत्साहानं न्हाऊन निघाला होता. महाराष्ट्र शासनाच्या शेतीखात्यानं खतोत्सव योजला होता आणि त्यासाठी पंचक्रोशीतल्या भजनीमंडळांना (म्हणजे लोकनृत्ये करणाऱ्या मंडळांना) निमंत्रण दिलं होतं.

सकाळी आठपासूनच ठिकठिकाणची मंडळं रंगीबेरंगी पोषाख घालून उत्सवाच्या मंडपात दाखल होऊ लागली होती. कार्यक्रमात भाग घेणाऱ्या पुरुषांनी मंडळाचं नाव असलेले गंजीफ्रॉक घातले होते व डोक्याला एकाच रंगाचे रुमाल बांधले होते, तर स्त्रिया ठराविक रंगांची पातळं आणि डोक्यात वेण्या घालून नटल्या होत्या. शीळफाटयावर असलेल्या हॉटेलशेजारच्या मोकळया मैदानात भव्य मांडव घातला होता. तो लोकांच्या गर्दीनं भरत चालला होता.

खोपोलीशेजारच्या डोंगरात राहणारा झिंग्या कातकरीही आपलं भजनीमंडळ घेऊन आला होता. त्यानं व त्याच्या सहकाऱ्यांनी कातकऱ्यांचेच पोषाख घातले होते. कमरेला लंगोटी, खांद्यावर तीरकामठा आणि डोक्याला पिसं बांधलेली. झिंग्याचं हे भजनीमंडळ इतरांच्यात चांगलंच उठून दिसत होतं.

इतरांचे नाच पाहता यावेत म्हणून झिंग्या बायकोला आणि तीन वर्षांच्या पोरालाही बरोबर घेऊन आला होता. डोंगरातली पाच मैलांची वाट तुडवीत वेळेवर येऊन पोचला होता तो. बरोबर भाकरी बांधून आणलेली होती.

झिंग्याला लिहिता–वाचता येत नव्हतं; पण त्या भागात अधूनमधून हिंडणाऱ्या मिशनऱ्यांमुळं तो धीट बनला होता. विचार करायला शिकला होता. त्यानं इतर कातकऱ्यांच्या मदतीनं भजनीमंडळ काढलं होतं. चांगले नाच बसविले होते. झिंग्या जसा हुषार होता तसाच तो तापटही होता. तो झट्कन रागवायचा आणि मागचापुढचा विचार न करता कृती करायचा. एकदा नाचात एक कातकरी चुकला तेव्हा झिंग्यानं त्याला चाबकानं फोडून काढलं होतं!

नऊ वाजता नाचाला सुरुवात झाली. मांडवाच्या मध्यावर असलेल्या बैठ्या स्टेजवर एक एक मंडळ नाच करून दाखवीत होतं. लाउडस्पीकरवरून कर्कश आवाजात गाणी म्हटली जात होती व त्याच्या तालावर कलाकार नाचत होते. त्यांच्या पायांतील घुंगरांच्या आणि ढोलकीच्या तालाला प्रेक्षक स्त्री–पुरुष आपल्या पायांनी ठेका धरीत होते.

मांडव प्रेक्षकांनी गच्च भरला होता. त्यात बहुतेक शेतमजूर स्त्री–पुरुष होते. उन्हात काम करून काळे पडलेले, फाटके कपडे घातलेले, कडक उन्हानं घामानं थबथबलेले चेहरे नाच मनापासून पहात होते. त्यांच्यात रंगून जात होते. अकराच्या सुमारास झिंग्याच्या मंडळाचाही नाच झाला. त्यांचे पोषाख, उन्हात चमचमणारी बाणांची धारदार टोके, ढोलकीच्या तालावर खालीवर होणारी डोक्यांना बांधलेली पिसे यामुळे सारे प्रेक्षक खूष झाले. टाळयांचा कडकडाट पुन्हा पुन्हा होत होता.

झिंग्या नाच संपवून खाली बसला तेव्हा बारा वाजायला आले होते. मांडवाबाहेर सूर्य तळपत होता. उकडून उकडून घामाच्या धारा लागल्या होत्या; पण गर्दीतून मांडवाबाहेर पाणी प्यायला जाण्याची सोय नव्हती.

तेवढयात समारंभाचे प्रमुख पाहुणे शेतीमंत्री स्टेजवर आले. त्यांच्यामागे मोठा लवाजमा होता. मंत्री आले आणि साऱ्यांना नमस्कार करून लोडावर बसले. झिंग्याला भयंकर तहान लागली म्हणून तो जागचा उठला; पण स्टेजवरून कुणी तरी खेकसलं,

'ए, खाली बस! मंत्रीसाहेब आलल दिसत नाहीत का?'

झिंग्या धनुष्यबाण सावरीत खाली बसला. खरं म्हणजे त्याला तहानेनं कोरड पडली होती. तहान भागविण्यासाठी म्हणून त्यानं बिडी काढली आणि पेटवली. शेजारीच त्याची बायको आणि तिच्या मांडीवर मुलगा बसला होता. गर्दीनं आणि उकाडयानं झिंग्याचा मुलगा कंटाळला होता. तो रडायला लागला. तेव्हा त्याला गप्प बसविण्यासाठी झिंग्यानं त्याच्या हातात काडयाची पेटी दिली.

तेवढयात समारंभ सुरू झाला. कोणी तरी मंत्र्यांचं स्वागत करीत होतं. त्याच वेळी स्टेजच्या एका बाजूनं काजूच्या बशा आणि लिम्कन गोल्ड स्पॉट अशी थंड पेयं आली. मंत्र्यांसह स्टेजवरील सारेजण त्याचा आस्वाद घेऊ लागले. स्टेजशेजारी बसलेल्या पत्रकारांपर्यंतही ही पेये जाऊन पोचली. ते काजू खात होते. थंड पेये पीत होते आणि सकाळपासून बसून कंटाळलेले, तहानेने व्याकूळ झालेले शेकडो चेहेरे त्यांच्याकडे आशाळभूतपणे पहात होते.

झिंग्याच्या छोटया मुलाचं लक्ष स्टेजवरील काजू खात असलेल्या आणि थंड पेयं पीत असलेल्या लोकांकडं गेलं. पोरच ते! पटकन म्हणालं, 'बाबा, मला हवं ते!' झिंग्यानं त्याला हातानं दाबलं; पण ते ऐकेना. पुन्हापुन्हा मागू लागलं. तेव्हा झिंग्या चिडला. त्यानं बककन पोराच्या पाठीत बुक्का घातला आणि म्हणाला, 'ठेवलाय तुझ्या बापानं! काजू खायचे होते तर कातकऱ्याच्या पोटी का जन्माला आलास? मंत्र्याच्या यायचंस!' मार बसल्यानं पोरानं भोकाड पसरलं. तेव्हा स्टेजवरून कोणी तरी ओरडलं, 'पोराला शांत बसवा. कार्यक्रम चालू आहे.!' झिंग्यानं पोराला मांडीवर घेतलं. फडक्यातला भाकरीचा कोरडा तुकडा काढून त्याच्या हातात दिला आणि स्वतःशीच म्हणाला, 'आम्ही इथं तहानेनं मरायला लागलो आहो आणि या साल्यांना काजू खाणं सुचतंय! आणि तेही आमच्यासमोर!' झिंग्यानं पुन्हा बिडी पेटवून झुरका घेतला.

कार्यक्रम चालूच होता. दोनतीन भाषणानंतर शेतीमंत्री बोलण्यास उभे राहिले. सुरुवातीस त्यांनी भजनीमंडळांचं कौतुक केलं आणि देशातील गरिबीच्या प्रश्नाला हात

घातला.

ते म्हणाले, 'आज माझ्यासमोर बसलेली जनता पाहून मला भडभडून येत आहे. त्यांना पुरेसं खायला नाही, अंगभर वस्त्र नाही, राहायला घर नाही. त्यांच्यासाठी आपण त्याग केला पाहिजे.–' 'याच वेळी झिग्याच्या तहानेनं कमाल मर्यादा गाठली होती. तो आवंढा गिळत गिळत भाषण कधी संपतंय व पाणी कधी पितोय याची वाट पहात होता.

मंत्री पुढे म्हणाले, 'आपल्या देशात अनेकदा दुष्काळ पडतो, पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होते, त्यासाठी आपण पाण्याचा वापर जपून केला पाहिजे. या गरीब लोकांची स्थिती सुधारेपर्यंत आपण भारी कपडे वापरायचे नाहीत, महागडचा वस्तू खायच्या नाहीत, सामान्यांप्रमाणे राहयचं अशी मी गांधीजींच्याप्रमाणे प्रतिज्ञाच केली आहे!'

मंत्र्यांच्या या वाक्यावर प्रथम स्टेजवरून व मागाहून मंडपातून टाळचांचा कडकडाट झाला. झिग्याचं डोकं गरगरा फिरू लागलं. त्याच्या मनात आलं, 'काय खोटं बोलतोय हा मंत्री! मघाशीच आमच्यासमोर बसून यांनी काजू खाल्ले, थंड पेयं पिली!' झिग्याचा राग अनावर झाला. त्याची बोटं थरथरू लागली. भुवया आणि ओठ रागानं उडू लागले. आपण काय करतो आहोत ते त्याच्या स्वत:च्या लक्षात येण्याआधीच त्याच्या डाव्या हातानं खांद्यावर अडकवलेला कामठा (धनुष्य) हातात घेतला, उजव्या हातानं बाण काढला आणि नेम धरून बाण सोडला. तो सुईऽऽऽ करीत थेट मंत्र्यांच्या छातीत जाऊन घुसला! ते धाडकन स्टेजवर कोसळले. या अनपेक्षित घटनेनं एकच गोंधळ उडाला. काय झालं ते कोणालाच नीट समजेना!

क्षणभरातच झिग्या भानावर आला. आपण हे काय केलं ते लक्षात येताच त्याची छाती दडपली. तो डोकं धरून तिथंच बसून राहिला. पुढच्याच क्षणी तिथं बंदोबस्तास असलेल्या पोलिसांनी झिग्याला पकडलं. मंत्र्यांना दवाखान्यात नेण्यात आलं; पण त्यापूर्वीच त्यांचा प्राण गेला होता!

एका मंत्र्याच्या खुनाची ही बातमी खोपोलीत आणि राज्यभर वणव्यासारखी पसरली. पुढचे दोनच दिवस जो तो त्याची चर्चा करीत होता.

महिनाभरात अलिबागच्या कोर्टात झिग्याविरुद्धचा खटला उभा राहिला. झिग्याची खाण्याची मारामार. तो कुठून वकील देणार? शेवटी सरकारनंच त्याला वकील दिला. दोन्ही बाजूंच्या वकिलांची भाषणे झाल्यावर झिग्याला फाशी होणार ही लोकांची खात्री झाली. शेवटी कोर्टानं झिग्याला विचारलं,

'तुला काही सांगायचंय?'

'हो!' तावडतोब गीता पुढं केली गेली.

'म्हण, मी खरं सांगेन. खऱ्याशिवाय काही सांगणार नाही.'

'तुझं नाव?'

'झिग्या कातकरी.'

'वय?'

'तीस.'

'धंदा?'

'लाकूड गोळा करणे, मध, डिंक जमविणे आणि ते विकणे.'

'तू खून का केलास?'

'साहेब, आम्ही गरीब माणसं. नेहमी अर्धपोटी राहणारी. चांगल्याचुंगल्या वस्तू आम्ही फक्त दुकानात पाह्यच्या आणि त्या आमच्यासाठी नाहीत असं म्हणत राह्यचं. असं किती दिवस चालायचं? आम्ही काम करायला नाही म्हणत नाही; पण काम करूनही पोट भरत नाही! उलट काही लोक काम न करताच पैसेवाले झालेले. साहजिकच राग येतो त्यांचा! श्रीमंतांनी गोडधोड खायचं आणि आम्ही त्यांच्याकडं पहात राह्यचं. लोकांनी हे त्यांच्या घरात केलं तर त्याला आमचा विरोध नाही; पण त्या दिवशी?

'त्या दिवशी आम्ही शेकडो लोक अन्नपाण्याविना उपाशी होतो आणि आमच्यासमोर स्टेजवरचे लोक काजू खात होते, थंड पेयं पीत होते! आम्हाला, आमच्या मुलांना काय वाटलं असेल? देश स्वतंत्र होऊन तीस वर्षं झाली तरी आमची ही क्रूर थट्टा का? हेही मी सहन केलं; पण मंत्री काय म्हणाले, 'मी तुमच्यासारखं साधेपणानं राह्यचं ठरविलं आहे. तुम्ही जे खाता, जे पिता तेच खाण्या-पिण्याची मी प्रतिज्ञा केली आहे! जज्जसाहेब, काही वेळापूर्वीच मंत्र्यांनी आमच्यासमोर आम्हाला उपाशी ठेवून काजू खाल्ले होते. आम्हाला त्यांच्या तोंडाकडं पाह्यला लावलं होतं. ह्याचा मला राग आला. आणि त्याच्या भरात मी बाण सोडला! साहेब, माझं चुकलं; पण मी काय करू? मला राहवलं नाही!'

झिग्याच्या डोळ्यांतून अश्रू वाहात होते. तोंड दाबून धरीत झिग्या म्हणाला, 'साहेब, माझ्या जागी तुम्ही असतात ना तरी तुम्ही हेच केलं असतं! तुम्ही हेच केलं असतं!! तुम्ही हेच केलं असतं!!!' आणि झिग्या खाली बसला. 'ऑर्डर, ऑर्डर!' जज्ज टेबलावर हातोडा आपटीत म्हणाले.

कोर्टात भीषण शांतता पसरली होती. कडा ओलावलेल्या डोळ्यांनी लोक एकमेकांकडे पहात होते. जज्जांनाही क्षणभर गोंधळल्यासारखं झालं. त्यांनी स्वत:ला सावरलं, आवंढा गिळला आणि जड आवाजात म्हणाले, 'सदोष मनुष्यवधाच्या आरोपावरून मी झिग्याला फाशीची शिक्षा देत आहे!'

कोर्ट उठले. डोळे पुसत प्रेक्षक पांगले आणि झिग्या मात्र फाशी-कोठडीची वाट चालू लागला!

□


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य या मूलभूत मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना विचार करायला लावणारी प्रभावी जीवनकथा

**मॅक्झिम गॉर्की**

**सुमती देवस्थळे**

मूल्य दहा रुपये

**राजहंस प्रकाशन**

१०२५ सदाशिव पेठ

पुणे ४११ ०३०

## पुस्तक परिचय

प्रा. ग. भा. जोशी

# संपूर्ण क्रांतीच्या दिशेने जयप्रकाशजी

महामना जयप्रकाश नारायण हे आजच्या आणि उद्याच्या भारताचे भाग्यविधाते आहेत. आजकाल त्यांच्या जीवनचरित्राचा, कर्तृत्वाचा, संपूर्ण क्रांतीच्या तत्त्वज्ञानाचा साकल्याने आणि सामग्र्याने शोधबोध घेण्याचे काम चालू आहे. वृत्तपत्रांतून, साप्ताहिकांतून आणि वैचारिक स्वरूपाच्या मासिकांतून त्यांच्या कार्यांचा ऊहापोह सतत चालू आहे. त्याचप्रमाणे ग्रंथरूपानेही त्यांचे समग्र चरित्र आणि कार्य नित्य प्रसिद्ध होत आहे. अशा पुस्तकांपैकी 'संपूर्ण क्रांतीच्या दिशेने जयप्रकाशजी' हे पुस्तक अतिशय वरच्या दर्जाचे आहे.

याचे महत्त्वाचे कारण म्हणजे या पुस्तकाचे लेखक श्री. वसंतराव नारगोलकर हे स्वत: भारतीय स्वातंत्र्यसंग्रामात महात्माजी, विनोबाजी आणि जयप्रकाशजी यांच्या प्रेरणेने सदैव कार्यरत असलेले सेवक आहेत. त्यांनी महात्माजींच्या 'चले जाव' आंदोलनात जसा सक्रीय भाग घेतला, देहदंड सोसला, त्याचप्रमाणे विनोबाजींच्या भूदान चळवळीत आणि चंबळखोऱ्यातल्या डाकूंच्या हृदयपरिवर्तनातही हिरीरीने भाग घेतला आणि जयप्रकाशजींच्या संपूर्ण क्रांतिकार्याला वाहून घेतले. त्याचप्रमाणे सर्वोदयी विचाराचे ते एक अभ्यासक आणि कार्यकर्ते म्हणून विख्यात आहेत. लेखक या विषयाशी एकरूप झाला असल्यामुळे 'ग्रंथ' जिवंत वाटतो.

लेखकाने गांधीजींचा अहिंसात्मक प्रतिकार, विनोबांचा सर्वोदय विचार आणि जयप्रकाशजींच्या संपूर्ण क्रांतीची वैचारिक पार्श्वभूमी यांचे तौलनिक आणि समतोल व आशयघन असे प्रतिपादन आपल्या ग्रंथात केले आहे, हा या ग्रंथाचा सर्वांत मोठा गुणविशेष होय. असा हा व्यापक विषय त्यांनी बारा प्रकरणांत अतिशय सुबोध, रसाळ आणि आकर्षक पद्धतीने आणि सविस्तरपणे मांडला आहे. आपल्या विवेचनाच्या पुष्टीकरिता ठायी ठायी जयप्रकाश यांच्या लेखणी-वाणीचे आधार देऊन ग्रंथाला वैचारिक अधिष्ठान प्राप्त करून दिले आहे. स्पष्ट, समतोल, अनाग्रही लेखन हे या ग्रंथाचे वैशिष्टय होय.

या पुस्तकाचा प्रारंभ जयप्रकाशजींनी मार्च १९७४ मध्ये बिहारमध्ये जे विराट जनआंदोलन सुरू केले त्यापासून होतो त्याचबरोबर जयप्रकाशजींच्या जीवनाचा धावता परिचय करून देऊन त्यांच्या वैचारिक बैठकीचे, त्यामागच्या स्थित्यंतराचे अभ्यासपूर्ण निवेदन केल्यामुळे जयप्रकाश हे मार्क्सवादाकडून साम्यवादाकडे, साम्यवादाकडून लोकशाही समाजवादाकडे, लोकशाही समाजवादाकडून सर्वोदयाकडे आणि सर्वोदयाकडून निष्पक्षीय लोकशाहीकडे, संपूर्ण क्रांतीकडे, कसकसे संक्रांत आणि उत्क्रान्त होत गेले याचे सुरेख चित्रण लेखकाने केले आहे.

ऐन उमेदीत जयप्रकाशजींनी विज्ञान, अर्थशास्त्र आणि समाजशास्त्र इ. विषयांचा सांगोपांग अभ्यास केला. त्यामुळे त्यांच्या विचारांची बैठक शास्त्राधारावर तयार झाली. नंतर त्यांनी मार्क्स, एंजल्स लेनिन, ट्रॉट्स्की यांच्या विचारग्रंथांचे परिशीलन केले. साम्यवादी विचाराने ते प्रभावित झाले. भारतात १९२९ ला त्यांची आणि महात्माजींची ऐतिहासिक भेट झाली आणि पुढे ते कॉंग्रेसचे जनरल सेक्रेटरी झाले. पुढे १७ मे १९३४ रोजी आचार्य नरेन्द्रदेवांच्या सहकार्याने त्यांनी कॉंग्रेस समाजवादी पक्षाची स्थापना केली. १९३५ मध्ये जयप्रकाशजींनी 'समाजवादच का?' या नावाची एक पुस्तिका प्रसिद्ध केली. तीत समाजवादाची मूलतत्त्वे, ध्येये आणि कार्यक्रम याविषयी चर्चा केली होती. तसेच गांधीजींच्या वर्गसमन्वय, अहिंसा वगैरेवर टीका केली. त्या काळातले त्यांचे क्रांतिविषयक विचार पुराणमतवादीच होते. शिवाय गांधीजींच्या अहिंसक क्रांतीचे त्यांना आकलन झाले नव्हते. तरीही ते गांधीजींचे आवडते होते. कॉंग्रेसच्या अध्यक्षपदाकरिता खुद्द गांधींनी त्यांना विचारले होते. पुढे १९४७ च्या फेब्रुवारीत कॉंग्रेस आणि समाजवादी पक्षात मतभेद झाले आणि 'समाजवादी पक्ष' स्थापन झाला. अखेर १९५२ च्या निवडणुकीनंतर ते पक्षीय राजकारणातून निवृत्त होऊन सर्वोदयाकडे वळले आणि १९७४ साली पुन्हा सर्वोदयाकडून संपूर्ण क्रांतीकडे त्यांनी मोहरा वळविला.

या ग्रंथात जयप्रकाशजींच्या जीवनाचा आलेख काढता काढता लेखकाने साम्यवाद, समाजवाद, गांधीवाद यांच्या तात्त्विक चर्चेतही रंग भरला आहे तसेच कॉंग्रेस, कम्युनिस्ट, समाजवादी पक्षांच्या ध्येयधोरणांची चिकित्साही केली आहे. सर्वोदय आणि संपूर्ण क्रांतीच्या उद्दिष्टांचा आणि मार्गांचाही मागोवा घेतला आहे. त्यामुळे या ग्रंथाने सर्वसामान्य आणि विचारी, अभ्यासू अशा वाचकांचे शंकासमाधान करण्याचे श्रेय प्राप्त करून घेतले आहे. हा ग्रंथ तर संग्रही बाळगावा असाच आहे. शिवाय आपल्या चिंतनाला तो प्रेरक ठरावा इतका मौल्यवान आहे.

'संपूर्ण क्रांतीच्या दिशेने जयप्रकाशजी'
लेखक : वसंत नारगोलकर
प्रकाशक : मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई ४
प्रथमावृत्ती : जुलै १९७७
पृष्ठे २१०; किंमत : १५ रुपये

# निकोप समीक्षा

आजकाल मराठी साहित्य चहू अंगांनी फुलत आहे; पण त्या प्रमाणात साहित्याचे निकोप आणि विशुद्ध असे समीक्षा-वाङ्मय निर्माण होत नाही ही साहित्याच्या रसास्वादाच्या आणि अभ्यासाच्या दृष्टीने मोठी उणीव जाणवते. मात्र नित्य नियतकालिकांतून साहित्य-परिचयात्मक लिखाण उदंडपणे प्रसिद्ध होत असतं; पण ते त्रोटक स्वरूपात! शिवाय समीक्षा-ग्रंथांना वाचक आणि प्रकाशकही अल्पच भेटतात. अशा परिस्थितीत या पुस्तकाचे लेखक व प्रकाशक धन्यवादास पात्र आहेत हे प्रथमच कबूल केले पाहिजे.

लेखकाने गेल्या दहा वर्षांत 'सत्यकथा,' 'प्रतिष्ठान,' 'आलोचना,' 'नवभारत'

इत्यादी दर्जेदार मासिकांतून जे समीक्षा-लेखन केले आहे त्यांपैकी एकोणीस लेखांचा संग्रह या पुस्तकात केला आहे. पुस्तकाच्या शीर्षकावरून सहज लक्षात येते की, लेखकाने दलित व ललित अशा साहित्यावरच आपले लक्ष केंद्रित केले आहे. या समीक्षा-पुस्तकाला प्रसिद्ध समीक्षक प्रा. नरहर कुरुंदकर यांची विवेचक प्रस्तावना लाभली आहे, हे या पुस्तकाचे एक वैशिष्टच ठरावे.

गेल्या काही वर्षांत दलित साहित्याच्या नवनिर्मितीमुळे अनेक प्रश्न, अनेक वाद, विविध दृष्टिकोन निर्माण झाले आहेत. या साहित्यकृतीच्या जिव्हाळयातून लेखकाने दलित साहित्य चळवळीचा आणि त्या अनुषंगाने साहित्याचा शोध घेतला आहे. दलित साहित्याच्या संदर्भात 'साहित्य परंपरा आणि लेखकाचे स्वातंत्र्य' आणि 'दलित जीवनाच्या सामाजिक पैलूंचा उद्रेक' या लेखात हा परामर्श आहे. या लेखात लेखकाने दलित साहित्य, लेखकांची बंडखोरी, अन्याय, परंपरा, हक्कांची जाण, साहित्य-परंपरा लेखकाच्या कलामनाचे स्वातंत्र्य, निरागस कलाकृती, अभिव्यक्ती इत्यादी विषयांचा मागोवा घेत जीवनानुभूती आणि विशुद्ध कलाकृती, स्वातंत्र्य हेच कस कसे लक्षणीय ठरतात याचे सुबोध विवेचन केले आहे.

सारांश दलित साहित्यासंबंधी विचार करताना लेखकाने विशुद्ध साहित्यासंबंधीची जपणूक करणे नितांत आवश्यक मानले आहे आणि हे मत सर्वमान्य व्हावे असे आहे. या पुस्तकातील दोन मानदंड लेख म्हणून ज्यांचा आवर्जून उल्लेख करावा ते म्हणजे 'गेल्या व चालू पिढीतील कलात्मक समज' आणि 'ग्रामीण कथेचा मानदंड—व्यंकटेश माडगूळकर......' या दोन्ही लेखांत लेखकाची समीक्षादृष्टी, अभ्यासू वृत्ती, चिकित्सक दृष्टी, साहित्यविषयक कलात्मक निकोप मन आणि सुजाणत्व जाणवते. पहिल्या लेखात जागतिक सकटाचा आणि परिस्थितीचा मानवी जीवनावर कसा ठसा उमटला आणि त्याच्या परिणामी साहित्यनिर्मितीवर, साहित्याच्या कलात्मक समजावर कसे बदल होत गेले याचे विवेचन आहे, तर दुसऱ्या लेखात श्री. व्यंकटेश माडगूळकरांच्या कथासृष्टीचे स्वरूप अत्यंत बारकाईने टिपले आहे. हे दोन्ही लेख मुळातच वाचले पाहिजेत.

गेल्या पाच-दहा वर्षांत ज्या साहित्यकृतींनी आपले बरेवाईट दर्शन घडविले, ज्या साहित्यकृतींचा विचार करणे अत्यावश्यक वाटले त्या 'कॉन्ज,' 'उभयान्वयी अव्यय,' 'रेणु,' 'एका स्पृश्याची डायरी,' 'पाचोळा, 'गोतावळा,' 'आक्टोपस,' 'मातीची चूल,' 'स्मरणगाथा,' 'रुद्रवर्षा' यासंबंधीही आपली मते स्वच्छपणे लेखकाने व्यक्त केली आहेत. यातली त्रुटी एवढीच की, या साहित्यकृतींचा उल्लेख फारच त्रोटकपणे व अपुरा केला आहे आणि या पुस्तकाचा विशेष गुण म्हणजे लेखक हा कोणत्याही साहित्यविषयक तत्त्वांना व सैद्धान्तिक मूल्यांना बांधून न घेता निकोपपणे आपले विचार मांडतो! ※

साहित्य : दलित आणि ललित
लेखक : गो. ग. कुलकर्णी
प्रकाशक : नूतन प्रकाशन, पुणे ३०
पृष्ठसंख्या : १४५
किंमत : १५ रुपये.

□


# टॉलस्टॉय पुस्तक योजना : ग्राहकांसाठी सूचना

टॉलस्टॉय पुस्तकयोजनेतील एकूण पाच पुस्तकांपैकी चौथे, रवींद्र पिंगे-लिखित 'पश्चिमेचे पुत्र' हे पुस्तक तयार झाले असून योजनेतील ग्राहकांनी ते कार्यालयातून घेऊन जाण्याची व्यवस्था करावी.

ज्यांना या योजनेतील पहिली तीन पुस्तके ( १ : आर्. डॉक्युमेंट, ले. अशोक जैन, २ : महाडचा मुक्तिसंग्राम, ले. प्रा. विवलकर + कांबळे, ३ : टच्, ले. अशोक प्रभाकर डांगे ) पोस्टाने रवाना झालेली असतील त्यांना हे चौथे पुस्तकही पोस्ट + पाठवणीखर्चाची व्ही. पी. करून पूर्वीप्रमाणेच रवाना होईल. फक्त पोस्टखर्च आणखीनच वाढलेला असल्यामुळे ज्या ग्राहकांना पुस्तक कार्यालयातून नेण्याची अन्य काही व्यवस्था करावयाची असेल किंवा पाचवे व चौथे पुस्तक एकदम मागवून पोस्टखर्चात थोडी बचत करावयाची असेल तर तसे त्यांनी लगेच कळवावे.

पाचवे पुस्तक सुमती देवस्थळेकृत 'टॉलस्टॉय एक माणूस' हे आहे. हे पुस्तक खूप मोठे असल्याने त्याची छपाई इत्यादि पूर्ण व्हायला २-३ महिन्यांचा तरी कालावधी लागणार आहे, याची मात्र ग्राहकांनी कृपया नोंद घ्यावी.

—व्यवस्थापक

राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव पेठ । नागनाथ पाराजवळ । पुणे ३०

# आमचे ग्रंथालय

## Russia : The People and the Power

By Robert G. Kaiser,
Pocket Books, Pages 557,
Dollars 2·25.

सध्या रशियाविषयी दोन पुस्तके गाजत आहेत. हॅड्रिक स्मिथचे 'द रशियन्स' या पुस्तकाचा परिचय मी 'माणूस'च्या ३–९–१९७७ च्या अंकात दिलाच आहे. रॉबर्ट कैसरचे हे दुसरे पुस्तकही तितकेच महत्त्वाचे व माहितीपूर्ण आहे.

जगात रशिया हा सर्वात जास्त मद्य पिणारा देश आहे, हे मी आधी सांगितलेच आहे. हे असे कॉम्युनिझममुळे होत आहे किंवा गारठ्यामुळे होत आहे हे सांगणे कठीण आहे रशियाच्या कोणत्याही शहरातून किंवा गावातून हिंडताना तुम्हाला प्यालेला माणूस हा दिसणारच हुकुमशाहीमुळे हे असे होत असेल तर आपल्या भारतात १९ महिन्यात पिण्याचे प्रमाण वाढले होते का हा एक संशोधनाचा विषय ठरेल.

अगदी अलीकडे मी मद्यपी लोकांवर एक लेख वाचला होता. या लेखकाने असा एक दृष्टिकोन दिला होता की, काही लोकांच्या शरीरातील पेशीच अशा असतात की, त्यांना अल्कोहोल सारखा हवाहवासा वाटतो. 'अल्कोहोलिझम' म्हणजे एक शारीरिक रोग असतो असा ह्या लेखकाने दावा केला आहे. मला स्वतःला असे वाटते की, कोणताच रोग निव्वळ शारीरिक किंवा निव्वळ मानसिक नसतो. Psyche व Soma हे मुळी वेगळे नाहीच. त्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. एकाची क्रिया ही दुसऱ्याची प्रतिक्रिया घडवून आणते; परंतु रशियासारख्या प्रचंड देशातील बहुतेक लोकांना हा अल्कोहेलिझमचा रोग जडावा हे म्हणणे अतिशयोक्तीचे वाटते. एखाद्या जमातीवर किंवा एखाद्या देशातील लोकांच्यावर संशोधन केल्यास असे आढळून येते की, काही विशिष्ट रोग त्या त्या जमातीत जास्त प्रमाणात आढळून येतात. (उदा पारशी स्त्रियांत स्तनाचे कॅन्सर अधिक असते) त्यामुळे असे असू शकेल की रशियन्स लोकांच्या शरिराच्या पेशींतील रचना अशी आहे की, त्यांना मद्य हवेहवेसे वाटते आणि या अशा ethnic दोषावर हुकुमशाही व थंडी याचा मारा चालू असल्यामुळे लोक आणखीनच मद्यपी होत असतील. अल्कोहोल पिऊन सुद्धा रशियन लोकांचे आयुर्मान जगात- सर्वांत अधिक आहे. तिकडे १०० वर्षांपलीकडचे लोक २०,००० आहेत. आझर बैजान तर या बाबतीत प्रख्यात आहे. तिकडे १३० ते १६० वयाचे म्हातारे आहेत. मला वाटते या प्रदेशातले लोक पीतच नसावेत किंवा अगदी कमी पीत असावेत.

हातभट्टीचा धंदा सुद्धा रशियामध्ये चालू आहे हे वाचून आश्चर्य वाटले. खेडेगावात हा प्रकार चालू असतो असे या पुस्तकात लिहिले आहे. मद्य पिण्यापोटी कामगाराचे किती खाडे व कुटुंबे कशी उध्वस्त होतात हे वाचले, की मोरारजीभाईंनी दारुबंदी भारतात लवकर आणावी असे वाटते.

लाल देशात आर्थिक विषमता पुष्कळ प्रमाणात असते. दक्षिण रशियामध्ये शेती फार पुढारलेली आहे. यामुळे तिथल्या लोकांचे रहाणीमान पुष्कळच सुधारले आहे. याउलट सायबेरियासारख्या प्रदेशात गरिबी व मागासलेपण दिसून येते.

रशियात गॉर्की फॅक्टरीत 'व्हॉल्गा' या गाडीचे उत्पादन केले जाते. टॅक्सीसाठी, सरकारी कामासाठी व काही पुण्यवान लोकांसाठी ही गाडी वापरली जाते. या व्हॉल्गाची किंमत १२,००० रुबेल्स असते. हे सांगण्याचे कारण असे की, रशियात उत्पादनाचे प्रमाण व किंमत यात सांगड नसते. एकदा तर एका खाद्यपदार्थाच्या कारखान्याने त्यांचा सर्व खर्च कमी होत असताना भाववाढ केली होती. काही अपयशी कारखान्यांना यश मिळत आहे हे दाखवण्यासाठी, तर कधीकधी लोकांवर अप्रत्यक्ष कर लादण्यासाठी किंमती ठरविल्या जातात.

क्रुश्चेवला एकदा असे सुचले होते की, लोकांनी खाजगी गाडी घेण्याऐवजी एक देशव्यापी 'कार–रेंटल पुल' काढावा. जेव्हा जरूर भासेल तेव्हा कोणत्याही व्यक्तीने या Pool मधून भाड्याने गाडी घ्यायची व परत करायची; पण हा विचार कागदावरच राहिला व पुढे क्रुश्चेव पदच्युत झाला तेव्हा 'फियाट'चा एक प्रचंड कारखानाच इंजिनियर्ससकट टॉगलायटीग्रॅड येथे उभारण्यात आला. १९७४ पासून तिकडे प्रतिवर्षी


### नवीन आलेली काही निवडक पुस्तके

१. सत्तेचे मोहरे : (महाराष्ट्रातील कॉंग्रेसचे राजकारण) फडणीस जगन — रु. १८·००
२. रंगले मी, झुंजले मी : (आत्मवृत्तांत) इंदिरा लाटकर — रु. १५·००
३. बॉम्बे सी. आय्. डी. : (गुन्हेगारी सत्यकथा) जयंत रानडे — रु. १८·००
४. बेलबॉड : (गुन्हेगारी सत्यकथा) श्रीकांत सिनकर — रु. १८·००
५. सी. आय्. डी. : (गुन्हेगारी सत्यकथा) श्रीकांत सिनकर — रु. १८·००
६. राघोभरारी : (ऐतिहासिक कादंबरी) कॅ. वासुदेव बेलवलकर — रु. ५०·००
७. सत्तावन्नचा सेनानी : (ऐतिहासिक कादंबरी) वसंत वरखेडकर — रु. २०·००
८. रानमुली : (कादंबरी) गो नी. दांडेकर — रु. ९·००
९. सहवास : (आत्मचरित्र) मालती दांडेकर — रु. २५·००
१०. माझा जीवनप्रवाह : (आत्मचरित्र) सी. डी देशमुख — रु. १९·००
११. कुलवृत्तांत : (नाटक) वृंदावन दंडवते — रु. ६·००
१२. खुन्नस : (गुन्हेगारी सत्यकथा) बा. सी. अष्टीकर — रु. १८·००

○ 'फिनिक्स'चे सभासदत्व ही आपल्या उच्च अभिरुचीची साक्ष आहे !
● वाढत्या महागाईत पुस्तके विकत घेण्यापेक्षा लायब्ररी लावणे नक्कीच स्वस्त आहे !

**दि फिनिक्स लायब्ररी,**
७२७, सदाशिव पेठ, पोस्टासमोर, पुणे ३०

६,६०,००० गाड्या निर्माण व्हायला लागल्या; पण गंमत अशी की, दुरुस्तीसाठी सर्व्हिसस्टेशने कुठेच उपलब्ध नव्हती. त्यासाठी आधी तरतूदच केली गेली नव्हती. शेवटी कंपनीनेच देशात ३० वेगवेगळ्या ठिकाणी 'सेंटर्स' उघडून गाड्या दुरुस्त करण्याचे ठरविले. सुरुवातीला मोटारगाड्या भरपूर; परंतु दुरुस्तीची केंद्रे कमी अशी स्थिती तर होतीच; परंतु मोटारींच्या मानाने रस्ते पण कमी व असमाधानकारक आहेत. यँकीडम (U. S. A.) मध्ये ४० लक्ष लांबीचे झकास रस्ते आहेत. लालमलाल रशियाचे क्षेत्रफळ यँकीदेशापेक्षा दुप्पट आहे आणि तिकडे फक्त अडीच लक्ष मैल लांबीचे रस्ते आहेत.

सर्व महत्त्वाचे निर्णय 'पॉलिटब्युरो' घेते. पण निर्णय किती महत्त्वाचे आहेत हे बघून परदेशियांना आश्चर्य वाटते. एकदा अशीच पॉलिटब्युरोची मीटिंग भरली होती. क्रुश्चेव 'चेअरमन' होते. मीटिंगचा विषय होता 'पुस्तकप्रकाशनातील दोष.' पहिले पुस्तक होते चीनवर. ते तीन वर्षांपूर्वी प्रकाशित केले गेले होते. त्या वेळी रशियाचे व चीनचे संबंध फार विघडले नव्हते. एकंदर पुस्तकात चीनविरुद्ध फारसा आवाज उठवला गेला नव्हता; पण पुस्तक तीन वर्षांचे जुने आहे याचा विचारही न करता त्या प्रकाशनकंपनीच्या डायरेक्टरला काढून टाकण्यात आले.

दुसरे एक पुस्तक पाळीव जनावरांवर होते. या पुस्तकात कुत्र्यांना मांस, अंडी व इतर पोषक आहार द्यावा असे लिहिले होते. 'लोकांना हे पदार्थ खावयास मिळत नाहीत आणि हा म्हणतो कुत्र्यांना ते घाला! काढून टाका या प्रकाशनकंपनीच्या प्रमुखाला!' असा निर्णय 'पॉलिटब्युरो 'ने घेतला.

पुस्तकप्रकाशनात हा असला प्रकार तर पुस्तकपरीक्षणात तेथे काय परिस्थिती असेल ते बघू. मुळात रशियामध्ये पुस्तकपरीक्षणे फारच कमी असतात. त्याचा असरही लोकांवर अत्यल्प असतो. लोकांना पुस्तकाच्या बाबतीत फार मोठा चॉइस नसतो. बाजारात उपलब्ध असेल ते त्यांना घ्यावे लागते. डॉस्टॉव्हस्की किंवा टॉलस्टॉयची एखादी नवी आवृत्ती काही तासांतच विकली जाते. रशियामध्ये पुस्तकविक्रेत्याकडे 'रशियन क्लासिक्स' कधीच उपलब्ध नसतात. परीक्षकांना थोडे रुबल्स देऊन पाहिजे तसे परीक्षण लिहिले जाते. किती प्रमाणात पुस्तकाची टीका करावी, किती प्रमाणात त्याची प्रशंसा करावी हे सर्व परीक्षकाला आधी कळविण्यात येते. 'Our Contemporary' या मासिकाच्या मार्च १९७४ च्या अंकात जी. मानुक्यन याने एक परीक्षण लिहिले होते. त्यात असे लिहिले होते की, 'झायनिस्ट लोकांनासुद्धा हिटलरसारख्या अवाजवी महत्त्वाकांक्षा होत्या!'

रशियन जेवढा मद्यपी असतो तेवढाच वावदूकही असतो. आता तो मद्यपी असतो म्हणूनच बडबड्या असेल असे म्हणता येईल. कुठे पार्टी वगैरे झाली की, बोलण्यात अती रंग चढतो. या बोलण्यामध्ये हरेक प्रकारचे विषय असतात. एकदा एका गृहिणीने पार्टीचे आमंत्रण पाठविले व ठरलेल्या वेळी लोक जमले नि ती त्यांना जेवायला डायनिंग टेबलाजवळ घेऊन गेली. लगेच तिचा नवरा तिच्यावर खेकसला, 'अरे, देवाचे अस्तित्व आहे की नाही या विषयावर आम्हाला चर्चा केल्याशिवाय का तू जेवण घालणार?'

हे पुस्तक एका यँकीनी लिहिले आहे हे विसरून चालणार नाही. या कारणामुळे ते चिमूटभर मिठाबरोबरच (with a hinch of salt) घेतलेले बरे. तथापि ते हॅड्रिक स्मिथच्या The Russians या पुस्तकाशी बहुतांशी जुळते. म्हणून यातली बरीचशी माहिती खरी असावी असे वाटते; पण अमेरिकन लेखकांनी रशियाचा पाणउतारा करावा याचे काही हे पहिलेच उदाहरण नाही. रशियाची चांगली बाजू देण्यास ते नेहमीच नाराज असतात. जॉन गुंथरसारखा एखादा तरल लेखक रशियाचे खरेखुरे वर्णन कधी लिहील याची मी वाट बघत आहे.

'In matrimony, sometimes to hesitate is to be saved' असे साम्युअल बटलर म्हणाला होता. (त्याने द वे ऑफ ऑल फ्लेश हे पुस्तक लिहिले होते.) रशियात जवळजवळ १० ते १५ टक्के साखरपुडा झालेल्या प्रेमी युगुलांची परिणती लग्नात होतच नाही. कारण साखरपुडा झाल्यानंतर सरकारी नियमानुसार प्रेमी युगुलांना लग्नासाठी एक महिना थांबावेच लागते! या एक महिन्यात प्रेमी युगुलांचे डोक्यात 'सेकंड थॉट्स' येतात!

— जे. एन्. पोंडा

— फिनिक्स लायब्ररी





**लेखक : पु. ल. इनामदार । राजहंस प्रकाशन, पुणे । मूल्य : वीस रुपये**

स्थानाच्या राज्यपालासाठी १७ खोल्यांचे दुसरे राजभवन आहे. याही राजभवनाची शोभा प्रशस्त हिरवळी आणि सुंदर बगीचे यांनी वाढविण्यात आली आहे. लोकशाही परंपरा स्वीकारलेल्या भारतासारख्या लोकशाही राष्ट्रामधील राज्यासाठी शाहीथाटाने राहणाऱ्या राज्यपालांची खरोखरच गरज आहे काय याचा पुनर्विचार करण्याची वेळ जरूर आली आहे. ज्याप्रमाणे राज्याराज्यागणिक विधानपरिषदांची गरज खरोखरच आहे काय हा एक जसा सतत चर्चिला जाणारा प्रश्न आहे. त्याचप्रमाणे राजा–महाराजांप्रमाणे असलेले हे राज्यपाल हाही एक सतत चर्चेचा आणि टीकेचा विषय आहे. विधानपरिषदांबाबत असे म्हणता येईल की, निदान काही राज्यांत तरी त्यांचे अस्तित्व नाही; पण राज्यपालांचे तसे नाही. राज्य मोठे असो अथवा लहान असो राज्य म्हटले की, राज्यपाल हा हवाच. अगदी केंद्रशासित प्रदेश असला तरीही नायब राज्यपालांची स्वारी हवीच !

राज्यपालांच्या राजकीय अस्तित्वाला खरोखरच फारच माफक किंमत राहिली आहे. गेल्या साली केंद्र सरकारने नऊ राज्यांच्या विधानसभा विसर्जित केल्या. त्या वेळी राज्यपालांना काहीही विचारले नाही, की त्यांचा सल्ला घेतला नाही. राज्यपालांकडूनही काही अहवाल आले नव्हते. काँग्रेसचा दारुण पराभव पायाभूत मानून लोकेच्छांची कदर करण्यासाठी नऊ राज्यांमधील विधानसभा विसर्जित करण्यात आल्या. करुणानिधी मंत्रिमंडळाची त्या वेळचे तामिळनाडूचे राज्यपाल के. के. शहा यांनी तारीफ केली होती आणि काही दिवसांतच राज्यपालांना पत्ता लागण्यापूर्वीच बाईंनी करुणानिधी सरकार बडतर्फ करून टाकले ! काँग्रेस जमान्यात तर दिल्लीकडे पाहून राज्यपालांनी आपले अहवाल सादर करण्याची वृत्ती सरसहा दिसून येत होती. राजकीय निर्णयांच्या बाबतीत विशेष महत्त्व नसले तरीही शासनप्रमुख म्हणून संबंधित राज्यामध्ये राज्यपालाचे स्थान फार महत्त्वाचे मानले जाते. एखाद्या राजा–महाराजाप्रमाणे त्याची बडदास्त ठेवण्यात येते. त्याच्या सेवेसाठी दोन चिटणीस, एक निजिसहाय्यक, एक शरीरसंरक्षक, एक डॉक्टर, एक नर्स आणि प्रसूतीच्या कामात प्रवीण असलेली एक परिचारिका यांचा समावेश असतो. आजवर एकाही राज्यपालाने राज्यपाल म्हणून काम करीत असताना अपत्याला जन्म दिलेला नाही. मग ही प्रसूतीच्या कामात प्रवीण असलेली परिचारिका काय करते ? प्रत्यक्ष राज्यपालासाठी तिचा उपयोग होत नसला तरी राज्यपालांच्या नातवंडाचा जर कधी राजभवनात जन्म झाला तर तिचा उपयोग होतो. याखेरीज इतर नोकरवर्ग तर इतक्या मोठ्या संख्येने असतो की, स्वतः राज्यपालालाच काही वेळा त्याचा उबग येतो. बरे, त्या साऱ्यांना देता येण्यासारखे कामही नसते. परिणामी सरकारी पैशाने त्यांची छान मौजमजा चालू असते. महाराष्ट्रामध्ये राज्यपाल म्हणून काम केलेल्या विजयालक्ष्मी पंडित यांनी या संदर्भात लिहिले आहे–राजभवनातील नोकर–अरे बाप रे ! या नोकरांचा प्रचंड फौजफाटाच असतो. नम्र, आळशी, तक्रारखोर अशी विविध स्वभावांची ही मंडळी आपल्या नवीन नवीन नातेवाइकांना राजभवनात घुसविण्याचा प्रयत्न करीत असतात. एवढ्या नोकरांची काय आवश्यकता असते हेच समजू शकत नाही. या नोकरमंडळींपैकी कित्येकांना कामच नसते ! राज्यपाल म्हणून काम केलेल्या विजयालक्ष्मी यांनी हे मत नोंदविले असले तरी राजभवनावरील नोकरवर्ग आहे तसाच आहे. इतकेच नव्हे तर काही ठिकाणी त्यांची वाढही झालेली आहे. राजभवनाच्या सफाईसाठी पंचवीस–तीस झाडूवाल्यांचा ताफा असतो. सरकारी खर्चाने एका 'प्रमुख शोफर'च्या हाताखाली काम करणारे चार ड्रायव्हर्स असतात. बागबगीचा संभाळण्यासाठी माळीकंपनी नळ ठोकून बसलेली असते आणि हा सारा खर्च तुम्ही–आम्ही कराच्या रूपाने भरलेल्या रकमेतून चालविला जातो ! राज्यपालांना विविध कारणांसाठी ज्या रकमा उपलब्ध करून दिल्या जातात त्याची विजयालक्ष्मी पंडित यांनी त्यांना आश्चर्यचकित करणारी एक आठवण नोंदविली आहे. ती आठवणही देण्यासारखी आहे. 'ध्वजदिनाच्या दिवशी काही मुले राजभवनावर आली त्यांच्या हातात निधी गोळा करण्याचे ते परिचित डबे होते. ती मुले माझ्यासमोर येऊन उभी राहिल्यावर मी चटकन आतल्या खोलीत गेले. माझी पर्स आणली आणि डब्यात टाकण्यासाठी पैसे काढले इतक्यात राजभवनावरील एक कार्यतत्पर अधिकारी लगबगीने पुढे झाला आणि म्हणाला, 'बाईसाहेब, आपण पैसे खर्च करण्याची गरज नाही. अधिकृत सरकारी रकमेतून आपण पैसे घेऊ शकता नव्हे तो तुमचा अधिकारच आहे !' असे म्हणून त्याने झटकन शंभराची नोट माझ्या हाती दिली. मी अवाक होऊन पहातच राहिले ' तर असे हे राज्यपाल देशातील प्रत्येक राज्याच्या राजधानीत शाही इतमामाने राहात आहेत. सरकारी तिजोरीमधील पैसा दोन्ही हातांनी खर्च करीत आहेत. राज्यपालांच्या शाही निवासामधील प्रशस्त बगीचे फुलविण्यासाठी आणि गुलाबांचे ताटवे लावण्यासाठी जेवढा पैसा प्रतिमासी खर्च होतो तेवढी रक्कम सर्वसाधारण भारतीय कुटुंबाच्या अन्नपाणी, कपडालत्ता आणि घरदार यावर वर्षाभरातही खर्च होत नाही ! कारण तेवढे उत्पन्नच कुटुंबप्रमुखाच्या हाती नसते ! राजभवनावरील खर्चाची काही आकडेवारी पहाण्यासारखी आहे. तामिळनाडू राजभवन डागडुजी बागबगीचांची देखभाल आणि वीजबिले यावर तीन लाख रुपयांपेक्षा जास्त रक्कम खर्ची घालते; तर महाराष्ट्र आणि पश्चिम बंगाल यांच्या बाबतीत हा आकडा सात लाख रुपयांच्या घरात आहे ! आलेल्या पाहुण्यांचे आगत–स्वागत करण्यासाठी आणि गाड्यांच्या ताफ्याच्या निगराणीसाठी महाराष्ट्राचे राजभवन पाच लाख रुपये प्रतिवर्षी खर्ची घालते. या सर्व गोष्टींना एकदम फाटा द्यावा अशातला भाग नाही; परंतु ज्या राज्याचे प्रमुख म्हणून आपण मिरवतो त्या राज्यामधील सामान्य जनतेचे राहणीमान आणि राज्यपालांची शान यांचे नाते असण्याची नितांत गरज आहे. मुंबई, कलकत्ता यांसारख्या शहरांतून रहाणाऱ्या राज्यपालांकडे देशी–विदेशी पाहुण्यांचा सतत ओघ असतो. तेथे थोडाफार जास्त खर्च होणे स्वाभाविक आहे; परंतु भुवनेश्वर, शिलांग, बंगलोर यांसारख्या ठिकाणी

मोठ्या खर्चाची आवश्यकता नसते. लोकशाही परंपरेमध्ये न बसणाऱ्या काही सवलती राज्यपालांना देण्यात आल्या आहेत. संस्थानी पद्धतीच्या या सुविधांची वास्तविक पहाता काहीही आवश्यकता नाही. राज्यपालांची स्वारी परदेशांतून आली की त्यांच्या सामानाची चाचणी होत नाही. त्यांनी आणलेल्या वस्तूंवर कोणताही कर नसतो. देशांतर्गत प्रवासाबाबत तर त्यांना असाधारण सुविधा असतात. तामिळनाडूचे माजी मुख्यमंत्री करुणानिधी यांनीही एकदा राज्यपालांवर जो अवाच्या सवा खर्च होतो त्याबाबत तक्रार केली होती. राज्यपालांच्या रहाणीमधून भारतीय परंपरांचे तसेच काटकसरीचे दर्शन झाले पाहिजे असे त्यांनी सुचविले होते. काही वेळा तर असेही मनात येते की, राज्यपालांची खरोखरच आवश्यकता आहे काय? केंद्र सरकारच्या प्रतिनिधीला राज्यपाल म्हणण्याऐवजी केवळ प्रतिनिधी म्हणून संबोधले आणि केंद्रामधील राज्यमंत्र्याचा दर्जा त्याला दिला तरी भागण्यासारखे आहे. असे केल्याने लोकांची दृष्टीही बदलेल आणि अवाजवी खर्चाला आणि शाही रहाणीला आळा बसेल. या संदर्भात केंद्र सरकारलाच काही हालचाल करावी लागेल. *

## □ महाराष्ट्राचे नवे मंत्रिमंडळ

याला घेणार...त्याला वगळणार...शरद पवारांचे काही खरे नाही. आत आलेच तर खाते मामुली मिळेल. एक ना दोन अनेक बातम्या उठत होत्या. दादांचे मंत्रिमंडळ जाहीर झाल्याने आता या साऱ्या बातम्या मागे पडल्या आहेत. एक मुख्य मंत्री, जवळजवळ तेवढेच सामर्थ्य असलेला एक उपमुख्य मंत्री आणि अन्य बारा कॅबिनेटमंत्री आणि चौदा राज्यमंत्री असलेल्या या मंत्रिमंडळाला खातेवाटप जाहीर होण्यापूर्वीच जांबुवंतराव धोटे यांनी दम भरला आहे. विदर्भातला रेड्डी काँग्रेसचा एकही मनुष्य त्यांना नको असताना वसंतराव नाईक यांचे पुतणे सुधाकर नाईक चक्क कॅबिनेटदर्जाचे मंत्री होतात म्हणजे काय? एकीकडे [सुधाकर नाईक यांची वर्णी लागते आणि दुसरीकडे त्यांना हवे असलेले वसंतराव देशमुख विधान परिषदेवर घेतले जात नाहीत याचा अर्थ काय? असा धोटेसाहेबांचा सवाल आहे. जांबुवंतरावांची नापसंती म्हटली तरी दादांच्या पोटात गोळा उभा राहावा इतके तुटके बहुमत पाठीशी असल्याने अवस्था आणखीनच नाजूक आहे. रत्नाप्पाअण्णांना मंत्रिमंडळात जागा न देता बाळासाहेबांनी दुसऱ्या खुर्चीसाठी सोडलेली विधानसभा-सभापतीची पहिली खुर्ची त्यांना देऊ करण्यात आली आहे. रत्नाप्पाअण्णा धुसफुसत असणार ही तर दिसती गोष्ट आहे. या पार्श्वभूमीवर केंद्रीय रेल्वेमंत्री मधु दंडवते यांनी हे मंत्रिमंडळ फार काळ सत्तेवर राहू शकणार नाही हा जो इशारा दिला आहे तो सूचक वाटतो. जांबुवंतरावांनी ताणून धरले आणि फॉरवर्ड ब्लॉकची चार-सहा डंकी इकडची तिकडे हालली तर मंत्रिमंडळाचा प्राण कासावीस होईल अशी अवस्था आहे. कुणाचाही रुसवा-फुगवा दादांच्या मंत्रिमंडळाला मानवणार नाही. जनता पक्षाने जेथे वर्चस्व गाजविले त्या मुंबई-कोकण आणि पुण्याला मंत्रिमंडळामध्ये जवळजवळ स्थान नाही. मुंबईचे रामराव आदिक आणि राम मनोहर त्रिपाठी यांना ते दोन्ही गृहांपैकी कोणत्याही गृहाचे सभासद नसताना मंत्रिमंडळामध्ये घेण्यात आले आहे. त्या दोघांखेरीज अन्य चार मंत्रीही कोणत्याच गृहाचे सभासद नाहीत. मुंबईचे पूर्वी चार मंत्री होते, आता नवीन मंत्रिमंडळामध्ये केवळ एक कॅबिनेटमंत्री आणि एक राज्यमंत्री यांनाच वाट मिळाली आहे. 'माणूस'मधून गाजलेले जवाहरलाल दर्डा कॅबिनेटदर्जाचे मंत्री झाले आहेत. मंत्रिमंडळाबाबतची एकंदर प्रतिक्रिया पाहून तोल सांभाळता यावा म्हणून दादांनी दोन जागा अजून मोकळ्याच ठेवल्या असून गरजेप्रमाणे मंत्रिमंडळाचा विस्तार करू असे पिल्लूही सोडून ठेवले आहे. अठ्ठावीस जणांच्या या मंत्रिमंडळात प्रभा राव या एकमेव महिलामंत्री. त्यांनी गेलेली खुर्ची परत मिळविली आहे विदर्भाला आजवर कधीही नव्हते एवढे प्रतिनिधित्व मिळाले आहे. पहिला उपमुख्यमंत्री तर विदर्भातील आहेच; पण खेरीज इंदिरा काँग्रेसचे चांगले दहा मंत्री विदर्भातील आहेत. खेरीज रेड्डी काँग्रेसचे सुधाकर नाईकही तिकडचेच. विदर्भातील मतदारांनी इंदिरा काँग्रेसला भरभरून मते दिली. त्याचे परिपूर्ण फळ त्यांना मिळाले.

महाराष्ट्राचे मंत्रिमंडळ बनायचे म्हणजे पूर्वी साहेबांचा केवढा दबदबा! परंतु या वेळी दादांनी उपचार म्हणून केलेल्या चर्चेच्या एक-दोन फेऱ्यांखेरीज यशवंतरावांचे नाव फारसे ऐकू आले नाही. नामदार नाशिकराव तिरपुडे यांच्या पत्रकारपरिषदेनंतर तर या संयुक्त मंत्रिमंडळावर दिल्लीहून कुणाचे वर्चस्व राहिलेच तर ते इंदिराजींचेच राहणार ही गोष्ट स्पष्ट झाली. शरद पवारांची नामदारकी शाबूत राहिली हाच साहेबांचा मोठा पराक्रम समजायचा, अशी अवस्था आहे. हा मजकूर लिहीत असताना खातेवाटप सुस्पष्ट झाले नसले तरी इंदिरा काँग्रेसने सहकार्याचा पुरेपूर मोबदला वसूल केला आहे असे या संदर्भात येणाऱ्या बातम्या सूचित करतात.

मंत्रिमंडळ अधिकारावर तर आले...परंतु मंत्र्यांच्या निवडीवरून उठणारे सादपडसाद, ज्यांना प्रतिनिधित्व मिळालेले नाही अशा विभागातील नाराज नेते आणि कार्यकर्ते यांच्या हालचाली, खातेवाटपावरून चाललेली अंतस्थ धडपड, या साऱ्यांचा परिणाम मंत्रिमंडळाच्या कार्यक्षमतेवर होणार ही तर दिसती गोष्ट आहे. अपक्ष आमदार बकोटीला मारून आणि जांबुवंतराव धोटे यांच्यासारखा बेभरंवशाचा नेता संगती घेऊन तुटपुंज्या बहुमताने सत्तेवर आलेले दादांचे हे मंत्रिमंडळ...आता पुढला प्रवास कसा करते ते पाहायचे. □

स. न. वि. वि.

' माणूस ' चा दिवाळी अंक थोडा उशीरा वाचला. खूपच आवडला. या अंकातील विनय हर्डीकर यांचा ' आम्ही आणि बदमाष काळ ' हा लेख अत्यंत सडेतोड व नेटका वाटला.

या लेखावरील प्रभाकर पाध्ये व श्री. ना. पेंडसे यांच्या प्रतिक्रियाही वाचल्या. श्री. ना. पेंडसे यांची प्रतिक्रिया हर्डीकरांएवढीच सडेतोड व प्रामाणिक वाटली.

११ जानेवारी १९७८

**प्रा. झुंबरलाल कांबळे**
( डॉ. आंबेडकर कॉलेज, महाड )

वरील स्वरूपाचे अभिप्राय अनेकांनी आजवर लेखी व तोंडी स्वरूपात कळविले. काही अभिप्राय ' माणूस ' अंकात प्रसिद्धही झाले.

मराठीत आजवर प्रसिद्ध झालेल्या आणीबाणीसंबंधीच्या लिखाणात बहुतेकांच्या मते सर्वोत्कृष्ट ठरलेला हा ' बदमाष काळाचा शोध ' संपूर्णपणे पुस्तकरूपात आता लवकरच प्रकाशित होत आहे.

# जनांचा प्रवाहो चालिला

## लेखक : विनय हर्डीकर

**' राजहंस प्रकाशन ' चे आणखी एक वैशिष्टयपूर्ण प्रकाशन**

चित्रपट परीक्षण

सदानंद बोरसे

# जैत रे जैत

## एक माणूस मधाची पोळी पाडतो, त्याची गोष्ट

घाशीराम कोतवाल, खेळिया आणि सामना-ची जबरदस्त पुण्याई पाठीशी घेऊन डॉ. जब्बार पटेलांनी 'जैत रे जैत' सादर केल्यामुळे साहजिकच 'जैत रे जैत'बद्दल अतिशय उत्सुकता होती, अपेक्षाही होत्या. शिवाय प्रायोगिक, प्रायोगिक म्हणून वृत्त-पत्रांनीही त्याचा नगारा पिटून ठेवला होताच. चित्रपटातील प्रत्येकाच्या गाठीशी अशीच कशाची ना कशाची पुण्याई साठलेली असल्याने अपेक्षा अधिकाधिकच उंचावत होत्या. शिवाय उषा मंगेशकर निर्मात्या, हृदयनाथ मंगेशकर संगीतकार, कथेचा आधार म्हणजे गो. नी. दांडेकरांची 'जैत रे जैत' आणि मराठी सिनेमा अशा आपलेपणाच्या बाजूही होत्या. त्याचप्रमाणे चित्रपटाबद्दलच्या प्रतिकूल प्रतिक्रियाही ऐकलेल्या. अशा पार्श्वभूमीवर 'जैत रे जैत' पहायला गेलो.

नाग्या (मोहन आगाशे) हा ठाकरवाडीतील भगताचा मुलगा. लहानपणापासूनच पुण्यवंत होण्याच्या कल्पनेने त्याला झपाटलेले असते. वाडीच्या रूढींप्रमाणे नाग्याही अनेक प्राण्यांना, झाडांना देव मानत असतो— नितांत श्रद्धेने; पण त्याच्या या श्रद्धांना तडे पाडणारे काही प्रसंग त्याच्या आयुष्यात घडतात आणि काही त्याच्या अडाणी अंधश्रद्धेमुळे त्याच्यावर ओढवतात. अशीच एकदा देवी राणीमाशीची प्रार्थना करूनही नाग्याला मधमाश्या चावतात. त्या क्षणापासून लिंगोबाच्या डोंगरावरील पोळ्यातून राणीमाशीला उठवून लावणे व तिचा सूड घेणे हेच नाग्याच्या आयुष्याचे ध्येय बनते. या कामात त्याला साथ देते फक्त त्याची बायको— त्याच्यासाठी जीव टाकणारी (आणि पहिला नवराही टाकणारी) चिंधी (स्मिता पाटील); पण लिंगोबाच्या डोंगरावरील पोळी पाडून सूड घेण्याच्या या प्रयत्नात चिंधी मरते. नाग्याजवळ फक्त एक पोकळ विजय उरलेला असतो.

अशी चित्रपटाची थोडक्यात कथा.

प्रथम चित्रपटाच्या जमेच्या बाजू सांगून टाकतो. चित्रपटाचे संगीत ना. धों. महानोरांची गीते आणि प्रमुख अभिनेत्यांची कामे या चित्रपटाच्या मोठ्या जमेच्या बाजू. चित्रपटात सूत्रधारांच्या तोंडी नसलेली आणि शुद्ध गाणी म्हणून वापरलेली सर्व गीते अप्रतिम आहेत. 'असं एखादं पाखरू वेल्हाळ' 'मी रात टाकली,' 'जांभूळ पिकल्या झाडाखाली ढोल कुणाचा वाजे', 'नभ उतरू आलं' ही गीते अक्षरशः वेड लावणारी आहेत. संगीताच्या दृष्टीने जशी ती वैशिष्ट्यपूर्ण आहेत, त्याचप्रमाणे कविता म्हणूनही सुरेख उतरली आहेत. ना. धों. महानोरांनी चित्रसृष्टीत पहिले पदन्यास तरी अतिशय कर्णमधुर टाकला. अर्थात 'जैत रे जैत' मध्येच त्यांनी बाकीची गाणी 'मागणी तसा पुरवठा' न्यायाने पाडून दिली आहेत; पण त्यामुळे या गाण्यांची श्रेष्ठता कमी होत नाही, तर संगीत हे 'जैत रे जैत'चे सर्वांत प्रमुख आकर्षण.

मोहन आगाशे, स्मिता पाटील, चंद्रकांत काळे, श्रीराम रानडे या कलाकारांचा अभिनय हा जमेपैकी मोठा वाटा. चंद्रकांत काळे व श्रीराम रानडे यांच्या चित्रपटातील सूत्रधारांच्या स्थानाबद्दल नंतर लिहीनच; पण सूत्रधारांची त्यांच्यावर टाकलेली भूमिका त्यांनी उत्तम सांभाळली. मोहन आगाशेने तर काही प्रसंगांमध्ये कमाल केली आहे— रानात एकटाच तंद्रीत ढोल वाजवत असताना त्याला मधमाश्यांनी हल्ला केल्याचा झालेला भास, शेवटी पोळी तोडतानाचा त्याचा आवेश, राणीमाशी उठून गेली हे कळल्यावर चढणारा फोल उन्माद. स्मिता पाटीलच्या बाबतीतही हेच म्हणता येईल. 'असं एखादं पाखरू वेल्हाळ'च्या वेळचे तिचे looks, 'मी रात टाकली' हे तिचे गीत. असे अनेक प्रसंग दोघांनी जिवंत केले आहेत. मंजिरी परांजपे, श्रीराम पेंडसे, सुलभा देशपांडे इत्यादींनीही आपापल्या छोट्या भूमिका व्यवस्थित सांभाळल्या आहेत. निळू फुलेने मात्र नाग्याच्या वडिलांच्या भूमिकेत घोर निराशा केली आणि सुशांत रेने तर आपल्या एकसुरी, उंच पट्टीतील बोलण्याने वैतागच आणला.

'चित्रपटाची कथा म्हणजे माणूस विरुद्ध निसर्ग असा लढा आहे.' 'चित्रपटात अटळपणे होणारा नियतीचा जय आहे.' 'माणसाच्या जीवनावर रूढींमुळे होणारे आघात हा विषय.' असे एक ना दोन, अनेक गुंतागुंतीचे निष्कर्ष या कथेतून काढता येतील, काढले आहेतही; पण हे सारे निष्कर्ष म्हणजे, इसापनीती अथवा पंचतंत्रातील गोष्टींच्या तात्पर्यासारखे वाटतात; कारण चित्रपट त्या गोष्टींसारखा वाटतो. मुळात या कथेत चौदा रिळांचा, सुमारे अडीच तासांचा चित्रपट काढण्याइतका जीव आहे का? ज्या रीतीने ही कथा सादर केली आहे, त्यावरून तरी तितकी प्रभावी ती मुळीच वाटत नाही. एका माणसाच्या मनातील निष्ठांचा एकेक इमला जमीनदोस्त होत जातो, हे अतिशय बाळबोध पद्धतीने मांडल्याने त्यात अपेक्षित असणारा electrifying अनुभव कोठे जाणवतच नाही. मुळापासून हादरविणारी अनुभूती कोठे मिळतच नाही. यावर आधीच स्पष्टीकरण दिले आहे. ते म्हणजे अलिप्तपणाचे किंवा detachment चे. संपूर्ण चित्रपटात केलेला सूत्रधारांचा वापरही अशा detachmentसाठीच आहे म्हणे आणि ही detachment का तर चित्रपटातील पात्रांशी समरस न होता वेगळ्या frame of reference मध्ये राहून चित्रपटाचा कलास्वाद अधिक चांगल्या आणि विशुद्ध रूपात घेता यावा म्हणून हा नवा प्रयोग.

मुळात म्हणजे चित्रपट पाहताना एक वेगळा cenamatic (चित्रमय किंवा चित्रपटमय) अनुभव प्रत्ययाला यावा, अशी आणि एवढीच माझी अपेक्षा असते, मग एखाद्या आत्यंतिक देमार चित्रपटाने तो दिला अथवा आत्यंतिक प्रायोगिक चित्रपटाने दिला, तरी मी दोन्ही चित्रपटांना चांगलेच म्हणेन. आजचे प्रायोगिक चित्रपट असा अनुभव देतात, म्हणूनच ते चांगले ठरतात आणि असा अनुभव देणाऱ्या चित्रांना प्रायोगिक

ठरविले जाते. केवळ कॅमेऱ्याची बाजू अथवा मांडणीच्या शैलीत (form of presentation) गमतीदारपणा आणून दरवेळीच असा अनुभव देणे साधत नाही आणि हे फक्त चित्रपटांच्या बाबतीत आहे, असे नाही, तर बहुतेक सगळ्याच कलांच्या बाबतीत हा प्रकार आहे. जब्बार पटेलांच्या 'घाशीराम'चे उदाहरण घ्या. त्या नाटकात मिळणारा जबरदस्त, थरारक अनुभव नंतर कित्येकांनी घाशीरामच्या form ची भ्रष्ट नक्कल करूनही कोणालाच साधला नाही. खुद्द जब्बार पटेलांनाही 'जैत रे जैत'मध्ये 'घाशीराम'ची संगीत, सूत्रधार इत्यादी बाबतीत चित्रपटी नक्कल करूनही तसा अनुभव त्यांना चित्रपटातून अजिबात देता आला नाही. 'घाशीराम'मध्ये सूत्रधारांचा वापर बोजडपणा टाळून कथा वेगाने पुढे सरकविण्यासाठी आणि विषयाचे निरनिराळे पैलू डोळ्यांसमोर आणण्यासाठी केलेला होता; पण detachment चा सोस त्या वेळी नसावा. याउलट 'घाशीराम'मध्ये कित्येक प्रसंगांमध्ये प्रेक्षकांना सामील करून घेतले जाते. उदाहरणार्थ—कीर्तन, नानाच्या लग्नाची वरात, घाशीरामने प्रेक्षकांमध्ये उतरून केलेला आक्रोश. 'जैत रे जैत'मध्ये मात्र या detachment च्या वेडाने त्यांना व पर्यायाने सूत्रधारांना पार झपाटून टाकलेले असावे. सर्वगामी, सर्वसंचारी नारदाप्रमाणे हे सूत्रधार स्थळ-काळाचे बंधन न पाळता हिंडतात. त्यांची दोघाजणांची टीमच आहे आणि कधीकधी एक स्त्री-सूत्रधारही त्यांना सामील होते. पुन्हा हे सूत्रधार साधे काही बोलण्याचा प्रयत्नच करीत नाहीत, तर हमखास विनोदी गाणी म्हणत हिंडतात. त्यांच्या एंट्रीलाच काही वेळ प्रेक्षकांकडे बघून 'आमची ठाकरवाडी ह: ह:' असे म्हणायचे व जोडीदाराकडे बघून कुत्सितपणे हसायचे असे कंटाळा येईपर्यंत उद्योग केल्यानंतर ते जे गाणे गात सुटतात, ते बहुधा नंतर दिग्दर्शकाच्याही हाताबाहेर गेले असावेत. शेवटी शेवटी तर मीही गायला लागलो होतो, 'नको सूत्रधारा। गाणे आत गाऊ। चित्रपटगृह। ओस पडे॥' त्याचा परिणाम म्हणून असेल; पण शेवटी केव्हा तरी त्या सूत्रधारांतील एकाला गाणे न म्हणण्याची उपरती झाली. शिवाय सूत्रधारांच्या तोंडी निवेदनांऐवजी जी गाणी आहेत त्यांच्या चाली साधारण सारख्याच मुखड्याच्या वाटतात आणि त्यांमधून सांगितला जाणारा तपशीलही अत्यंत फुटकळ आणि किरकोळ. ही गाणी अतिशय कंटाळवाणी होतात ती त्यामुळेच. शिवाय हे सूत्रधार सतत चित्रपटात आतबाहेर करीत असतात. या 'तळ्यात की मळ्यात'च्या खेळात कधी कधी तर त्यांचा ३/४ भाग चित्रपटात व उरलेला ३/४ भाग (१/४ ची चूकभूल द्यावी–घ्यावी.) चित्रपटाबाहेर असे होत राहते. उदाहरणार्थ— नाग्याला आवरण्याबद्दल सांगायला गेलेल्या म्हाताऱ्याबरोबर एक सूत्रधार त्याच्या बाजूनेच बोलायला म्हणून गेलेला असतो; पण चिंधीने म्हाताऱ्याला चापल्याबरोबर हा सूत्रधार पटकन आपल्या वेगळ्या सूत्राची आणि वेगळ्या धारेची आठवण झाल्यागत बाहेर येतो, 'ही चिंधी, हा म्हातारा, चिंधी म्हाताऱ्याला चांगली खडसावते.' अशा थाटात झालेल्या प्रकाराचा सारांश आणि महत्त्वाचा भाग पुन्हा प्रेक्षकाला समजावून देतो आणि पुन्हा आपला 'जैत रे जैत'मध्ये उडी मारतो. शिवाय कथा पुढे नेण्यापुरताच तपशील सांगणे असा सूत्रधारांचा भाग मर्यादित असता तरी हरकत नव्हती. रानातून जाणाऱ्या एकट्या चिंधीवर वा दुकट्या चिंधी-नाग्यावर त्यांची हेरगिरीही चालू राहते. या सगळ्या प्रकरणात detached होऊन विशुद्ध कलास्वाद मिळणे बाजूलाच, वेळोवेळी 'ए चल, सिनेमातून बाजूला हो!' असे उगीच फटकारे बिचाऱ्या अगोदरपासून बाजूलाच असलेल्या प्रेक्षकाला खावे लागतात. प्रेक्षक समरस होईल इतका प्रभावी व तीव्र प्रसंग संपूर्ण सिनेमात नाहीच. (अरे, तो उंदरं मारण्याचा प्रसंग?'— आमचा एक खट मित्र.) नाग्याला व चिंधीला मधमाश्या चावणे हे प्रसंग अशा प्रकारचे हाल जाता-येता, सहजासहजी पाहायला मिळत नसल्याने थोडीशी चुकचुक मिळवतात. अशी चुकचुक 'आशिक हूँ बहारों का'मधील एका प्रसंगाने (बारा तेरा' सुसरींचा तांडा राजेश खन्नाभोवती घोटाळत असतो.) याच कारणासाठी मिळवलेली ऐकली असल्याने मला त्या चुकचुकीचे वा प्रसंगाचेही फारसे अप्रूप वाटले नाही. विशेषतः दुसऱ्याच्या गाण्यातही नाक खुपसून सूत्रधारांचे नको नको इतके सूत्रधारण करून सोडले आहे. 'मी रात टाकली' गाण्यातील कोरस ती ऐकण्यापेक्षा पडद्यावर पाहिला, तर माझे म्हणणे लगेच पटेल.

गाण्यांच्या बाबतीतही या सूत्रधारणासारखाच अतिरेक झालेला आहे. सूत्रधारांनी गाणीबजावणी करीत उनाडणे एक वेळ समजू शकते; पण चिंधीला घरात ठेवून घ्यावे की नाही या वादाचे खंडन–मंडनही गाण्यात व्हावे, हा प्रेक्षकांच्या सहनशीलतेचा कडेलोट करून मग तिचा झालेला अंत गाणी म्हणत पाहण्यासारखे आहे. या गाण्यातील 'ठेवून घे ग तिला, थोडी दारू दे मला' या 'ट ला ट, री ला री' ओळींवरून संपूर्ण गाण्याची कल्पना यावी. महानोरांच्या माथी चांगल्या गाण्यांच्या श्रेयाबरोबरच हे अपश्रेयही ओघाने जातेच.

सूत्रधारांच्या या form ला अवास्तव महत्त्व दिल्याने इतर गोष्टींकडे दुर्लक्ष झाले आहे. व्यक्तिरेखांच्या ठसठशीतपणाचा व रेखीवपणाचा विचार केला तर चिंधी ही अतिशय जहाल बाई; पण तितकीच नाग्याच्या बाबतीत हळुवारही आहे. बापाला तरसापुढे टाकण्याची, मणक्यात फाटा घालण्याची अन् जिवंतपणी मढं गाडण्याची धमकी देणारी, नवऱ्याच्या गळ्यात दोरी अडकवून त्याला झाडाला टांगण्याची भाषा करणारी चिंधी प्रेक्षकाला चकणेच करते; पण हे निवे चित्रण वाडीतील आणखी एक बाई (ही सुद्धा आपल्या म्हाताऱ्याचे मढे गाडण्याच्याच विचारात असते) आणि नाग्याची आई (ही पोराचा लोद्या बनवून टाकते.) या दोघीजणी, एकदम प्रातिनिधिक व त्यामुळेच मिळमिळीत बनवून टाकतात. असेच दुर्लक्ष पात्रांच्या संवादांबाबत. गाणी म्हणजे कविता म्हणजे मनातील भावना वगैरे असल्याने ती पुरेशी ठाकरवाडीय नाहीत असे म्हटले, तरी संवादही अतिशय शुद्ध वाटतात. डोळ्याला 'डोला' म्हणणे आणि 'नाही'च्या जागी 'नही' म्हणणे एवढा फरक केला की, शहरी सदाशिवपेठेची ठाकरवाडी होत नाही. महानोरांच्या गाण्यांमध्ये तर चक्क मेघमल्हार वगैरे उल्लेख आले आहेत. नृत्यगीतांमध्ये समूहनृत्याच्या हालचाली या वास्तवाच्या नावाखाली इतक्या अनाकर्षक आहेत की, त्यामुळे पडद्यावर चाललेली परेड गाण्याची

गोडी बरीच कमी करते. चित्रपटाचे डबिंग काही ठिकाणी अतिशय चुकीचे झाले आहे. मध्ये एकदा फिल्ममध्ये ' End of part 12 ' असाही एक भाग येऊन जातो. त्याच त्याच शॉटची पुनरावृत्ती (मधाची पोळी) फार वेळा आहे. कदाचित या सगळ्याही प्रेक्षकाला detached करण्यासाठी वापरलेल्या युक्त्या असाव्यात.

सांगाड्याला अवास्तव महत्त्व दिले की, कोणतीही कलाकृती किती निर्जीव व नीरस बनत जाते, याचे उदाहरण म्हणजे ' जैत रे जैत '. नाव ' जिंकला रे जिंकला ' असले तरी–! ※

# पहेली

## एक प्रसन्न टवटवीत अनुभव

ताराचंद बडजात्या या निर्मात्याचे मला नेहमीच कौतुक वाटत आले आहे. उपहार, पिया का घरपासून ते गीत गाता चल, तपस्या आणि कालपरवाच्या दुल्हन वही जो पिया मन भायेपर्यंत या गृहस्थांनी सतत काही तरी नवीन देण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. कधी कथावस्तू नवीन, तर कधी सरळसोट कथेची मांडणी करणारा नवा हात–नवा दिग्दर्शक. कधी पडद्यावरील नवे चेहरे, तर कधी पडद्यामागील नवा आवाज. आणि प्रत्येक चित्रपटातून अशा एका तरी नव्या आणि चांगल्या ( हे विशेष ) गोष्टीची हिंदी चित्रसृष्टीत भर पडत आली. केवळ चित्रपटांच्या बाबतीतच त्यांनी हे नाविन्य शोधले नाही; तर धंद्याच्या दृष्टी-नेही काही धाडसी पावले टाकली. थिएटर मिळत नाही, असे दिसल्याबरोबर ' जीवन–मृत्यू ' हा चित्रपट नवा–कोरा असताना मॅटिनीला प्रदर्शित करण्याचा आणि तेथे सुवर्ण–महोत्सव साजरा करण्याचा विक्रम करणारे ताराचंद बडजात्याच !

' पहेली ' हा त्यांचा नव्यानेच प्रदर्शित झालेला चित्रपट. या चित्रपटातूनही त्यांनी नमिताचंद्रा ही नवीन नायिका, आणखी काही नवीन चेहरे, एका नवा पार्श्वगायक आणि प्रशांत नंदा हा नवीन दिग्दर्शक पेश केला आहे. बहुतेक सर्वच जण आशादायक आहेत आणि नमिताचंद्रा ही तर खात्रीलायक अभिनेत्री आहे.

उपहार, गीत गाता चल आणि दुल्हन वही–या तीन चित्रपटांमधील वेगवेगळे भाग जुळवून एकत्र केलेल्या आणि या सगळ्या जोडकामावर फिनिशिंगचा हात फिरवून, एकजिनसीपणा आणून दिग्दर्शक प्रशांत नंदांनी कथा–पटकथाकाराचे श्रेयही स्वतः-च्याच नावावर जमा केले आहे. या कथेची-सुद्धा हिंदीत आता एक चाकोरीच बनली आहे.

माँटू ( सत्यजित ) हा शहरी किशोर सुट्टीत आपल्या श्रीमंत आजीजवळ राहण्या-साठी एका खेड्यात जातो. तेथे त्याची मुलाखत गौरी ( नमिताचंद्रा ) या अल्लड ग्रामीण किशोरीशी होते. पहिल्या भेटी-पासूनच गौरी व तिची मैत्रीण चंपा माँटूच्या अफलातून फिरक्या घेतात. ( एवढा मोकळे-पणा पुण्यासारख्या ठिकाणीही अभावानेच आढळतो. तात्पर्य काय, तर तरुणांनो, खेड्याकडे चला ! ) मग माँटू व गौरीचे एकत्र फिरण, गावातील गमतीदार ठिकाणे ( आणि त्यातूनच अस्सल ग्रामीण लोक-जीवनातील गोडी, सौंदर्य वगैरे ) बघणे यथास्थित म्हणजे माँटूच्या प्रेमळ व चतुर आजीच्या देखरेखीखाली व प्रोत्साहनाने पार पडते. या प्रोत्साहनाचा लाभ उठवून गौरी व चंपा एक नौटंकीचा नाच नाचून घेतात आणि माँटूही बाजा वाजवून घेतो. थोडक्यात माँटू व गौरी एकमेकांवर चांगल्यापैकी इंप्रेशन मारून घेतात. पाऊस, आजारपणा-तही गौरीने माँटूला निरोप द्यायला येणे, येताना आठवणीने शिंगाडे घेऊन येणे या

प्रसिद्ध झाले

पश्चिमेचे पुत्र

रवींद्र पिंगे

ऑस्कर वाइल्ड
अर्नेस्ट हेमिंग्वे
विन्स्टन चर्चिल
एडगर वॉलेस
......

पश्चिमेच्या या प्रतिभावंतांची
सुंदर व्यक्तिचित्रे

राजहंस प्रकाशन, पुणे ३०.
मूल्य : चवदा रुपये

सगळ्यांतून दोघांच्या मनांच्या तारा जुळून येतात. त्या जुळल्या तारा घेऊन मांटू शहरात परततो, कॉलेजला जातो आणि एक वर्षाने पुन्हा गौरीच्या ओढीने आजीच्या खेड्याकडे परततो; पण आता गौरी सुजाण तरुणी बनलेली असते. साहजिकच मांटूपुढे यायला ती लाजते; पण हा बदल लक्षात न आल्याने मांटू मात्र तिच्यावर वैतागतो. एकटाच गाणे म्हणत गावाबाहेर भटकतो (तेवढाच पूर्वीच्या आठवणी, भास वगैरे डायरेक्शन दाखवावयाचा चान्स) हा मांटूचा वैताग चालू असतानाच गौरीचे लग्न ठरविण्याचा बेत चाललेला. अखेर मांटूच्या आजीच्या चतुराईमळे मांटूचे व गौरीचे मीलन होते. म्हणजे शेवट अर्थातच हा. (हा म्हणताना हाताने लाडवाची खूण)

तेव्हा टीन-एजर्स लव्ह आणि एका अल्लड, खोडकर मुलीचे लाजाळू तरुणीत होणारे रूपांतर (कळीचे फूल किंवा असल्याच कशाचे तरी काही तरी होणे) हा तसा अतिशय घिसा-पीटा विषय; पण नवे चेहरे, नवे आवाज आणि (तशी नेहमीचीच) खेळकर हाताळणी यांमुळे एक प्रसन्न अनुभव चित्रपटातून मिळतो, म्हणूनच खेड्यातील मुलगी तीही आपल्या कजाग मामीच्या कचाट्यात वाढणारी एखाद्या अनोळखी शहरी मुलाशी इतक्या मोकळेपणाने वागेल, का प्रत्यक्षात खेड्यातील लोकही हे सर्व खपवून घेतील का (मग त्याला नीट खतपाणी घालण्याची गोष्टच दूर!) या व अशाच शंका मनात येऊनही मी हे वास्तव जरा बाजूला सारले आणि चित्रपटातील नवेपणाचे, टवटवीतपणाचे मनःपूर्वक स्वागत केले.

या नवेपणात सर्वांत मोठा वाटा नमिताचंद्राचा. गौरीच्या व्यक्तिरेखेला व वयाला फिट्ट बसणारी ही जेमतेम सोळा वर्षांचीच अभिनेत्री असेल. तिने दौरीच्या दोन्ही बाजू-खट्याळ, खोडकर किशोरी आणि नंतर अबोल प्रेम करणारी लाजाळू तरुणी अतिशय सहजसुंदरतेने साकार केल्या आहेत. शिवाय अभिनयाबरोबरच नवेपणा व टवटवीतपणामुळे तिचे पडद्यावरील दर्शन अतिशय विलोभनीय बनले आहे. (आपल्याकडील प्रौढ वयाऱ्ही कोवळ्या तरुणींच्या भूमिका दणक्यात करणाऱ्या नट्यांच्या सततच्या प्रदर्शनाचाही परिणाम आहेच) हेच सगळे वर्णन थोड्याशा कमी प्रमाणात चंपाचे काम केलेल्या अभिनेत्रीलाही लागू पडते. जया भादुरी (उपहार) सारिका (गीत गाता चल), राखी (जीवन-मृत्यू), रामेश्वरी (दुल्हन वही) अशा अतिशय गुणी नायिकांची परंपरा बडजात्यांनी जशी नमिताचंद्राच्या रूपाने राखली आहे, तशीच अतिशय ठोकळेबाज नायक निवडण्याची स्वतःची परंपराही मोडलेली नाही. -सत्यजीतच्या मुखवट्याच्या रूपाने बरेच काही नवे व चांगले शोधणाऱ्या या निर्मात्याला आजपर्यंत नवा व चांगला नायक मात्र मिळू शकला नाही. स्वरुप दत्त (उपहार), अनिल धवन (पिया का घर), सचिन (गीत गाता चल), प्रेम किशन (दुल्हन वही -) हे सगळेच नायक ठोकळेबाजपणात व न-अभिनयात एकमेकांचे जानी स्पर्धकच होते कालपर्यंत 'मास्टर' असलेला सत्यजितही 'पहेली' मधून आता या स्पर्धेत दाखल झाला आहे. पहिल्यापासून शेवटपर्यंत ठराविक त्रासिक चेहऱ्याने बोलणे, सुटलेले पोट हलवीत पळणे आणि थोडयाशा उड्या मारणे याव्यतिरिक्त काहीच न करण्याची पठ्ठ्याने प्रतिज्ञा केली असावी. याउलट बलराम या तरुणाची भूमिका केलेल्या नव्या दमाच्या अभिनेत्याने मात्र छोट्याशा भूमिकेतही बाजी मारली आहे. फक्त त्यामे राजेश खन्नाची नक्कल करण्याचा प्रयत्न करू नये, अशी एक नम्र सूचना. गौरीच्या मामेबहिणी-रेखा व रूपा - म्हणून वावरलेल्या दोघी नव्या अभिनेत्रींनीही आपापली कामे ठसक्यात केली आहेत. बाकी दुर्गा खोटे (मांटूची आजी), लीला मिश्रा (बलरामची आई) दीना पाठक (गौरीची मामी) व ए. के. हनगल (गौरीचे मामा) ही वडीलधारी मंडळी नेहमीच्या सराईत जुनेपणाने वावरली आहेत.

प्रशांत नंदा यांची दिग्दर्शनशैली हलकी-फुलकी असली तरी सगळीच कामगिरी अतिशय सरधोपट व जुन्याच पठडीतील आहे अगदी मोजक्याच ठिकाणी त्यांच्यातील थोडीफार चमक दिसली-मांटूला पहिल्यांदा निरोप देताना त्याला द्यायचे राहून गेलेले अर्धवट उमललेले कमळ हातात घेतलेली गौरी अथवा मांटू एक वर्षाने परतल्यानंतर मोठे झालेले झाड (काळाचा आणि झाडाच्या वाढीचा मेळ बसतो का, हा प्रश्न अलाहिदा) आणि अशाच दोन-चार जागा. अर्थात 'तरुण प्रेम' हा विषय हातात मिळाल्याबरोबर सतत गाणी म्हणत मिठ्या मारणाऱ्या नायक-नायिकांचे स्वस्त आणि बाजारू प्रदर्शन न घडविल्याबद्दल प्रशांत नंदांचे काही गुन्हे माफ करणे चालण्यासारखे आहे.

'पहेली'ची गीते व संगीत रवींद्र जैन यांचे. सगळीच गाणी गोड आहेत, ऐकायला बरी वाटतात; पण लक्षात मात्र फारशी राहात नाहीत. 'सोना करे झिलमिल' या गाण्याचा अपवाद. आधी वा नंतर बाहेर ही गाणी फारशी ऐकलेली नाहीत, त्याचाही हा परिणाम असेल. एका नव्या पार्श्वगायकाला (त्याचे नाव काही आठवत नाही.) संधी दिल्याबद्दल जैनसाहेबांचे अभिनंदन; पण एक नवा मोकळा आवाज याव्यतिरिक्त हा गायक फारसा प्रभाव पाडू शकलेला नाही. बहुतेक सगळी गाणी चित्रपटात व्यवस्थित पेरली आहेत.

चित्रपटाची आणखी उल्लेखनीय बाजू म्हणजे नयनरम्य छायाचित्रण आणि सिनेमास्कोप आकार.

आजच्या फॉर्म्युला ॲक्शनपॅक्ड हिंदी चित्रपटांच्या धुमाळीत या चित्रपटाचे एक वेगळा अनुभव म्हणून स्वागत होईल ही अपेक्षा. □

MANOOS ( Marathi Weekly ) 75 Paise Regd. No. PNC-68

